दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

ओबीसींसाठी नवा पक्ष उभारू; प्रकाश शेंडगेंची मोठी घोषणा

मुंबई : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या मराठा आंदोलनाला आज यश आले. त्यांनी केलेल्या विविध मागण्या राज्य सरकराने मान्य केल्या. त्यानंतर वाशीतूनच मराठा आंदोलक माघारी फिरले. असे असतानाच ओबीसींच्या आंदोलनाला धक्का न लावता मराठा समाजाला न्याय दिला जाईल असे म्हटले जात होते. दरम्यान आजच्या अध्यादेशानंतर ओबीसी नेते प्रकाश शेंडेगे यांनी त्यांचा संताप व्यक्त केला आहे. तर ओबीसींवर अन्याय होत असेल तर त्यांच्यासाठी नवा पक्ष उभारू असेही प्रकाश शेंडगे यावेळी म्हणाले. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी त्यांचे आंदोलन तुर्तास स्थगित केल्यानंतर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांकडे प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी ओबीसींवर अन्याय केल्या जाणार नसल्याचे म्हणाले. ते म्हणाले की, आरक्षण देण्याचा मार्ग हा कायद्यानेच काढावा लागेल हे आधीपासूनच सांगत होतो.

* (आष्टी) वर्धा * रविवार दि.०४/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २०९ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242



मुंबई महापालिकेचा सन २०२४ - २५ चा ५९ हजार ९५४.७५ कोटींचा अर्थसंकल्प शुक्रवारी सादर करण्यात आला. २०१७-१८ ला बजेट सादर केलं, तेव्हा त्याचा आकार २७००० कोटी इतका होता, ७ वर्षांत ते दुपटीपेक्षा अधिक कसं होत आहे. हे होत असताना मुंबई महापालिकेचं उत्पन्न कुठेही वाढताना दिसत नाही. उलट ते दरवर्षी कमी होत चाललं आहे. असं असताना वाढत्या बजेटला आधार देण्यासाठी उत्पन्नाची साधनं कोणती उपलब्ध आहेत? फँजिबल एफएसआयमधून महापालिकेला या आधी दरवर्षी ४५०० ते ५००० करोड रुपये मिळायचे, जे या वर्षी फक्त १५०० कोटी रुपये इतकेच मिळाले आहेत. उत्पनाचा अजून एक मोठा सोर्स हाती असून सुद्धा महापालिकेला त्यातून पैसे उभे करता आले नाहीत. शुक्रवारी सादर झालेल्या अर्थसंकल्पात एकूण विकास प्रकल्पांवर २ लाख कोटी रुपये खर्च करण्याची घोषणा आहे, पण या विकासकामांसाठी महापालिका पैसे कुठून उभे करणार आहे. त्यामुळे बजेटचा आकडा मोठा पण खोटा आहे.

- रवी राजा, माजी विरोधी पक्षनेते, मुंबई महापालिका



बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यांतील रुग्णांना सुद्धा उत्तम आरोग्य सेवा पुरविल्या जातात. मुंबईकरांकडून प्राप्त होणाऱ्या कर/शुल्कातून महानगरपालिका आरोग्य सेवेवर मोठ्या प्रमाणात खर्च करत असल्याने महाराष्ट्राबाहेरून उपचारासाठी येणाऱ्या लोकांसाठी स्वतंत्र शुल्क रचना लागू करण्याबाबत विचार करणे आवश्यक आहे. या शक्यतेची सुद्धा चाचपणी पालिका करेल, असे सूतोवाच मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात करण्यात आले असून, ही बाब आक्षेपार्ह व अन्यायकारक ठरणारी आहे. भाजपाचा याला विरोध राहील.

- आशिष शेलार, अध्यक्ष, मुंबई भाजप



महालक्ष्मी रेसकोर्सच्या प्रस्तावित विकासाबाबत पालिका प्रशासक तथा महापालिका आयुक्त यांनी एक शब्दही न बोलणे ही मुंबईकरांची पूर्णतः फसवणूक आहे. गेल्या काही महिन्यांपासून या विषयावर बरीच चर्चा होत आहे. तबेल्यांच्या पुनर्बांधणीसाठी पालिका १०० कोटी रुपये खर्च करणार असल्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात याबाबत काही स्पष्टता येईल, अशी अपेक्षा नागरिकांना होती. जर प्रशासक रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबला जाऊन या प्रस्तावाच्या अनुषंगाने सादरीकरण देऊ शकत असतील, तर मुंबईकरांच्या सार्वजनिक हितासाठी ते तो प्रस्ताव जनतेसमोर का ठेवू शकत नाहीत. यावरून असे दिसून येते की, पालिका गोष्टी गुंडाळून ठेवायच्या आहेत. त्यामुळे बीएमसीच्या हेतूवर नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होत आहे.

- ॲड. मकरंद नार्वेकर, माजी नगरसेवक



भारतातील सर्वाधिक श्रीमंत अशा महानगरपालिकेचा दावा आणि सर्वसामान्य नागरिकांना दिसणारे वास्तव यातील विसंगती हा अर्थसंकल्प अधोरेखित करतो. हवा प्रदूषणाचा सामना करण्यात महापालिका प्रगती करत आहे, असे यातून प्रतिपादित होत असले, तरी प्रत्यक्षात अनेक बाबींची पूर्तता करणे बाकी आहे. कचरा जाळणे, कचऱ्याचे वर्गीकरण आणि बांधकामादरम्यानची धूळ या बाबींकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

- ऋषी अग्रवाल, संस्थापक संचालक, मुंबई सस्टेनेबल सेंटर

शैक्षणिक दर्जा उंचावणार

शिक्षण विभागाचा ३४९७ .८२ कोटींचा अर्थसंकल्प सादर

यंदाच्या अर्थसंकल्पात १५० कोटींची वाढ

मुंबई : मुंबई महापालिका शाळांचा दर्जा उंचावण्यासह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून २०० शाळांमध्ये खुल्या व्यायम शाळा, विद्यार्थ्यांसाठी शब्द कोश, किचन गार्डन असे नवीन उपक्रम राबवण्यात येणार आहेत. तसेच मिशन मेरीट, मिशन अँडमिशन, डिजिटल शिक्षण, २२० शाळांमध्ये कौशल्य विकास केंद्र, आयसीएसई, सीबीएसई बोर्डाच्या शाळांची उभारणी, व्हर्चुअल ट्रेनिंग सेंटर, डिजिटल क्लासरूम, विचारशील प्रयोगशाळा, आधुनिक पद्धतीचा अवलंब आदी महत्त्वाच्या तरतुदी यंदाच्या अर्थसंकल्पात केल्या आल्या आहेत. मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ३४९७.८२ कोटींचा व १५०.६९ वाढीचा अर्थसंकल्प पालिका अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांनी शुक्रवारी पालिका आयुक्त व प्रशासक इक्बाल चहल यांना पालिका सभागृहात सादर केला. मागील वर्षी ३३४७.१३ कोटींचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता.

मुंबई महापालिकेने मिशन ॲडमिशन एकच लक्ष्य- एक लक्ष्य ही विशेष मोहीम राबवून शाळांतील पटसंख्या वाढवली जात आहे. या मोहिमेद्वारे २०२३-२४ मध्ये १ लाख ९ हजार विद्यार्थ्यांचा प्रवेश झाला आहे. ही मोहीम अधिक प्रभावी करून पटसंख्या वाढवली जाणार आहे. शाळांत परीक्षेच्या १०० टक्के निकालाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मिशन ३५ हा उपक्रम राबवण्यात आला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या बदल्यांबाबत ऑनलाईन सॉफ्टवेअर बनवले जाणार आहे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य खरेदी केले जाणार आहे. नाविन्यपूर्ण गणित आणि विज्ञान केंद्र उभारणी केली जाणार असल्याची माहिती पालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी दिली.

मुंबई महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार व डिजिटल शिक्षण देण्यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. कार्यानुभव शिक्षण ऑनलाईन, टॉय लायब्ररी, व्हर्च्युअल ट्रेनिंग सेंटर, आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण, ई वाचनालय, डिजिटल क्लासरूम, टॅब पुरवठा, विद्यार्थ्यांच्या आरोग्य साधनांवर सुधारणा असा डिजिटल शिक्षणावर भर देणारा हा अर्थसंकल्प आहे. तसेच रिसोर्स इन्स्टिट्यूट संस्थेतर्फे पालिकेच्या विद्यार्थ्यांकरिता किचन गार्डन हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. यावर अधिक भर दिला जाणार आहे. स्काऊट गाईड अभ्यासक्रमातही याचा समावेश करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत महापालिकेच्या २५ माध्यमिक शाळांमध्ये इंटरनेटच्या सुविधेसह ४ संगणकामार्फत ई-वाचनालये सुरू करण्यात आली आहेत. त्याच धर्तीवर पालिकेच्या ५० प्राथमिक शाळांमध्ये ई-वाचनालये सुरू करण्यात येणार आहेत.

महापालिका शालेय विद्यार्थ्यांना खगोलीय घडामोडींचे ज्ञान व त्या विषयातील जिज्ञासू वृत्ती वाढीकरिता तसेच विद्यार्थ्यांमधील निरीक्षण, एकाग्रता व आकलन क्षमतेमध्ये वाढ होऊन संशोधन वृत्ती जागरूक होण्यासाठी खगोलीय प्रयोगशाळांची साहित्यांसह उभारणी करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. मुंबई महापालिकेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात अत्याधुनिक अशा सोयीसुविधांयुक्त इंटरनेट वायफाय, अभ्यासक्रमाचे सॉफ्टवेअर व अधिक काळ चालणाऱ्या बॅटरीसह १९,४०१ टॅब पुरवण्यात आले आहेत. त्यामुळे शाळांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात मागील वर्षीच्या अर्थसंकल्पातील बहुतांशी योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या योजना प्रभावीपणे राबवल्या जाणार असून त्यासाठी यंदाही भरीव तरतूद करण्यात आली आहे.

हाऊस किपिंग - सन २०२२ ते २०२५ या कालावधीकरिता पालिकेच्या एकूण ४६९ शालेय इमारतींची देखभाल, स्वच्छता व सुरक्षेसाठी १४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. इंद्रधनुष्य (टॅलेंट शो) इंद्रधनुष्य या कार्यक्रमाद्वारे पालिका विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करण्यात आले आहे.



गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम

विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण

महापालिकेच्या निवडक शाळांमधील मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल. सदर उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर १९६ शाळांमधील नववी व दहावीच्या १२ प्रकारच्या अभ्यासक्रमांसह एकूण २२० कौशल्य विकास केंद्र स्थापन केली जाणार आहे. यासाठी १० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

ग्रंथालयांना अनुदान

पालिकेच्या मालकीची एकूण २९ सार्वजनिक ग्रंथालये मुंबई मराठी ग्रंथालय या संस्थेमार्फत चालवली जात आहेत. सभासद संख्या विचारात घेऊन १९ ग्रंथालयांकरिता मुंबई मराठी ग्रंथालयास ३७.५० लाख इतके अनुदान देण्यात आले आहे. तसेच दि एशियाटिक सोसायटी या संस्थेस ५० लाख अनुदान देण्यात आले आहे. या ग्रंथालयांसाठी १.५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

बदल्यांसाठी सॉफ्टवेअर

मुंबई महापालिकेच्या शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या बदल्यांमध्ये पैशांचा व्यवहार होत असल्याचा आरोप केला जातो. हा आरोप खोडून काढण्यासाठी बदल्यांबाबत ऑनलाईन सॉफ्टवेअर विकसित करण्याचे नियोजित आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या बदल्यांचे धोरण निश्चित करून मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी ऑनलाईन सॉफ्टवेअरद्वारे पारदर्शकपणे बदल्या करण्यात येतील शासन नियमानुसार पात्र शिक्षकांच्या बदल्या करण्यात येतील. बदलीस पात्र असलेल्या शिक्षकांना शाळांचा पसंतीक्रम देण्यात येईल. त्यांनंतर बदली करण्यात येईल.

दिव्यांगांसाठी उपक्रम

पालिकेच्या १८ विशेष शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता तपासणी व निदान केले जाईल. फिजिओ, स्पीच आणि ऑक्युपेशनल थेरपीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करून दिले जाणार आहे. शालेय इमारतीच्या संरक्षक भिंतीवर आतल्या बाजूस विद्यार्थ्यांना शैक्षणिक नैतिक मूल्य व सामाजिक जबाबदारीचे संदेश देणारे चित्रांचे रेखाटन केले जाणार आहे. राज्य शासनाच्या धर्तीवर पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी शाळांमध्ये नाविन्यपूर्ण गणित व विज्ञान केंद्र उभारली जाणार आहेत.

नवीन योजना आणि किचन गार्डन

महापालिकेच्या विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयक आवड निर्माण व्हावी, यासाठी शहरी शेती उपक्रमांतर्गत ऑर्गेनिक फार्मिंगवर (किचन गार्डन) ही योजना महापालिकेच्या दोन शाळांमध्ये सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीची संकल्पना समजावून भाज्या पिकवण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या पिकवलेल्या भाज्यांचा वापर मुलांच्या मध्यान्ह भोजनामध्ये केला जात आहे. आगामी काळात महापालिकेच्या १०० शाळांमध्ये ऑर्गेनिक फार्मिंगचा प्रयोग राबवण्यात येणार आहे.

खुल्या व्यायामशाळा

मुंबई महापालिकेच्या २०० शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खुल्या व्यायामशाळा सुरू करण्यात येणार आहेत. ही योजना राज्य सरकारच्या जिल्हा नियोजन समिती-मुंबई उपनगर आणि मुंबई महापालिकेच्या वतीने राबवण्यात येणार आहे.

शाळांमध्ये खगोलशास्त्र प्रयोगशाळा

शाळांमध्ये खगोलशास्त्र प्रयोगशाळा स्थापन केले जाणार आहे. तसेच अग्निशामक साहित्य आणि उपकरणाची खरेदी, शाळांमध्ये बोलक्या संरक्षक भिंतींची निर्मिती करण्यासाठी भरीव तरतूद, वन्यजीव आणि जैवविविधतेच्या माहितीकरिता तरतूद करण्यात आली आहे.

सुदृढ आरोग्यासाठी ७,१९१ कोटी

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १२ टक्के वाढ

मुंबई : पालिकेच्या प्रमुख रुग्णालयासह सर्वसाधारण रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर पालिकेच्या आरोग्य विभागाने भर दिला आहे. १ एप्रिलपासून झिरो प्रिस्क्रिप्शन धोरण अंमलात आणण्यात येणार असून, यासाठी ५०० कोटींची तरतूद केली आहे. तसेच रुग्णालयाचे नूतनीकरण, रुग्णसेवेत वाढ यासाठी यंदाच्या सन २०२४-२५ अर्थसंकल्पात ७ हजार १९१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शुक्रवारी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे.

सर्वात श्रीमंत मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प शुक्रवारी सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात मुंबई महापालिकेची प्रमुख रुग्णालये व उपनगरीय रुग्णालये सक्षम करण्यासह नव्या योजना आणि अत्याधुनिक मशीन आणण्यावर भर दिला गेला आहे. गेल्या अर्थसंकल्पातील अनेक योजना यंदा पुन्हा एकदा अर्थसंकल्पात मांडण्यात आल्या आहेत. यावर्षीच्या अर्थसंकल्पात मुंबईच्या आरोग्यासाठी ७,१९१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, आरोग्याचा बजेट १२ टक्क्यांनी वाढला आहे.



डायलिसीस सेवांचा विस्तार!

सर्व प्रमुख रुग्णालयांत अतिरिक्त ३० रुग्णशय्या उपलब्ध करुन डायलिसीस सेवांचा विस्तार व सक्षमीकरण करण्यात येत आहेत.

सर्व रुग्णालयांत एचएमआयएस!

रुग्णसेवेत सुसूत्रीकरण व पारदर्शकता आणण्यासाठी पालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञान प्रणाली अंतर्गत एचएमआयएस सेवांचा अवलंब करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च ३०६ कोटी रुपये एवढा आहे.

मुख्यमंत्री आरोग्य आपल्या दारी योजना!

"मुख्यमंत्री आरोग्य आपल्या दारी" अंतर्गत मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक आरोग्य आणि मोठया प्रमाणात आढळणारे कर्करोग या आजारांची तपासणी करून संशयित रुग्णांना पुढील निदानासाठी संदर्भ सेवा देणे, वयोवृद्ध तसेच संवेदनशील नागरिकांची घरी जाऊन रक्त तपासणी करणे व त्यांच्या रोगाच्या पुढील उपचारांचे व्यवस्थापन करणे यांचा समावेश आहे.

'कर्करोग नियंत्रण मॉडेल'

कर्करोग नियंत्रणासाठी कर्करोग नियंत्रण मॉडेल स्थापन करण्यात येणार आहे. ज्यामध्ये तोंड, स्तन, गर्भाशय कर्करोग नियंत्रणासाठी विभाग पातळीवर निदान व संदर्भ सेवा देण्यात येणार असून त्यामध्ये सार्वजनिक व खासगी क्षेत्रांचा समावेश असेल.

पैसे भरा आणि उपचार घ्या !

मुंबईबाहेरील रुग्णांना उपचारासाठी मोजावे लागणार पैसे

मुंबई : स्वस्त व योग्य उपचार पद्धती यामुळे देशभरातील रुग्ण पालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी धाव घेतात; मात्र यापुढे पालिकेच्या रुग्णालयात मुंबईबाहेरील रुग्णांना उपचारासाठी पैसे मोजावे लागणार आहेत. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात याबाबत पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुंबईबाहेरील रुग्णांचे उपचार महागणार आहे.

सन २०२४-२५ चा अर्थसंकल्प शुक्रवारी सादर करण्यात आला. यात अर्थसंकल्पाचे आकारमान १०.५० टक्क्यांनी वाढले आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात ५४ हजार २५६ कोटी ७ लाख रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. यावेळी म्हणजे २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा तब्बल ५९ हजार ९५४ कोटी ७५ लाख रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. म्हणजेच अर्थसंकल्पाचे आकारमान ५ हजार ६९८ कोटी रुपयांनी वाढला आहे.



अर्थसंकल्पाच्या सुरुवातीला आयुक्तांनी मुंबई वायुप्रदूषण नियंत्रण योजनाबाबत भाष्य करत, मुंबई प्रदूषणमुक्त करण्यासाठी येणाऱ्या वर्षभरात विविध उपाययोजना हाती घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. रस्त्यावरील धूळ कमी करण्यासाठी आणि हवा शुद्धीकरणाच्या योजनांचा विस्तार करण्यासाठी यांत्रिकी झाडूची खरेदी आणि ई-पॉवर स्लीपरचा वापर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

रेसकोर्ससाठी मुंबईकरांनो पुढे या - आयुक्त

मुंबई : महालक्ष्मी येथील रेसकोर्सच्या ९७ एकर जमिनीवर उद्यानच होणार असून, कुठलेही बांधकाम होऊ देणार नाही. रेसकोर्स मुंबईकरांसाठी असून, रेसकोर्ससाठी त्यांनी पुढे यावे, असे आवाहन पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. इक्बालसिंह चहल यांनी केले आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प शुक्रवारी सादर झाल्यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मुंबई १ लाख ४ हजार एकर जमिनीवर वसली आहे. रेसकोर्सची जागा रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबला १९१४ साली भाडे करारावर देण्यात आली. हा भाडे करार २०१३ मध्ये संपुष्टात आला; मात्र त्यानंतर करार वाढवण्यात आलेला नाही. एकूण २२६ एकर जमीन असून, त्यापैकी १२० एकर जमिनीवर रेसकोर्स, तर ९७ एकर जमिनीवर मुंबईसाठी उद्यान असणार आहे. याबाबत १८ डिसेंबर रोजी रेसकोर्सवर पार पाडलेल्या बैठकीत स्पष्ट केले होते; मात्र विकासकाच्या घशात रेसकोर्सची जागा असा आरोप केला जात आहे; मात्र हा आरोप बिनबुडाचा असून, रेसकोर्सची ९७ एकर जमीन मुंबईसाठी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. रेसकोर्सबाबत मतदान प्रक्रिया राबवण्यात आली असून, त्यापैकी ७७ टक्के मतदान रेसकोर्सच्या जमीनीवर उद्यान व्हावे या बाजूने केले आहे. त्यामुळे आता मुंबईकरांनी रेसकोर्ससाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मुरली तांडा या गावात जगतगुरु संत सेवालाल महाराज जयंती थाटामाटात साजरी होणार



दै.जनप्रभात
उमरखेड प्रतिनिधी/ लखन जाधव

उमरखेड:- उमरखेड तालुक्यातील मुरली तांडा या छोट्याश्या गावात या गावात संपूर्ण बंजारा समाज राहतो या गावात १५ फेब्रुवारी ला जगतगुरु संत सेवालाल महाराज जयंती थाटामाटात साजरी होणार बंजारा वेशभूषा बंजारा पारंपरिक डफडा वर नाच गायन लेंगी मुरली गावातील मंडळ यांच्याकडून नाच गायन गावात रॅली चे आयोजन करण्यात आले आहे यावेळी बिटरगाव पोलीस ठाणेदार प्रेम केदार उमरखेड महागाव विधानसभा आमदार नामदेव ससाणे यवतमाळ भारतीय जनता पार्टी नेते नितीनभाऊ भुतडा हिंगोली लोकसभा नेते बंजारा समाज नेते डॉ बी डी चव्हाण हिंगोली लोकसभा भाजप प्रभारी रामदास पाटील सोमठाणकर माजी आमदार राजेंद्र नजरधने माजी आमदार उत्तमराव इंगळे माजी आमदार विजयराव खडसे सामाजिक कार्यकर्ते साहेबराव कांबळे बेलखेडकर बंदीभाग नेते युवराज जाधव कल्याणराव मिराशे पाटील बबलू जाधव पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

****

संपादकीय .....

दबावतंत्राची खिचडी!

मुंबई महापालिकेत कोरोना संकटकाळात झालेल्या कथित खिचडी घोटाळा प्रकरणात युवा सेनेचे कार्यवाह सूरज चव्हाण यांना अंमलबजावणी संचालनालया (ईडी)ने बुधवारी अटक केली आहे. सूरज चव्हाण हे ठाकरे गटाचे आमदार आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. त्यामुळे सूरज चव्हाण यांना झालेली अटक ही ठाकरे गटासाठी मोठा धक्का आहे. त्यातही आदित्य ठाकरेंच्या निकटवर्तीयांपैकी एखाद्या व्यक्तीला झालेली ही पहिलीच अटक आहे. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात दिलेल्या निकालाची चिरफाड करणारी महापत्रकार परिषद झाल्याच्या दुसर्याच दिवशी ही अटक झाली हेही विशेष. सध्या ठाकरे गटातील अनेक नेते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या मागे तपास यंत्रणांचा फेरा लागलेला आहे.लोकसभा निवडणुकीआधी यापैकी अनेक नेत्यांवर कारवाईची कुर्हाड चालू शकते असा अनेकांचा होरा आहे. दीड वर्षापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अभूतपूर्व बंड होऊन शिवसेनेची दोन शकले झाली होती. उद्धव ठाकरेंच्या हातातून आमदार निसटले तशी सत्ताही गेली. सर्वोच्च न्यायालयात पक्षनेतृत्वापासून सत्ताबदलापर्यंतच्या प्रत्येक मुद्यावर काथ्याकूट होत असताना निवडणूक आयोगाने शिंदे गटाकडे शिवसेनेची सूत्रे सोपवून आश्चर्यकारक असा निकाल दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निवाड्यातूनही हाती काहीच लागले नाही आणि आता विधानसभा अध्यक्षांनीदेखील निवडणूक आयोगाच्याच पावलावर पाऊल ठेवत सर्वांनाच बुचकाळ्यात टाकणारा परंतु अपेक्षित असाच निकाल दिला. त्यामुळे ठाकरे गटाचा मोठा अपेक्षाभंग झाला आहे. तरीही त्यांनी लढण्याचा निर्धार केला आहे.वरळीत झालेली महापत्रकार परिषद हा त्याचा पुरावा होय. अनेकांच्या दृष्टीने क्लिष्ट असणारे हे कायदेशीर प्रकरण अत्यंत साध्या सोप्या भाषेत समजावून सांगत ठाकरे गटाने महाराष्ट्रात नवा पायंडा पाडला आहे. शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठीमागे मुठी आवळलेल्या आणि बाह्या सरसावलेल्या तरण्याबांड शिवसैनिकांची फौज असायची. कुठल्याही अन्यायाविरोधात कधीही रस्त्यावर उतरण्यास तयार असलेल्या शिवसैनिकांची महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी ओळख होती. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली तयार झालेली शिवसैनिकांची ही दुसरी पिढी आहे. कधी नव्हे ते संविधान, कायद्याची भाषा बोलणारी, शिस्तबद्ध पद्धतीने बसलेली, कुठेही गडबड गोंधळ, अर्वाच्च शिवीगाळ न करणारी ही शिवसेना म्हणूनच अधिक परिपक्व असल्याचे दिसत आहे. शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसचीदेखील दोन शकले झाली आहेत. सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट), भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) महायुती अधिक बळकट आणि राज्यातील महाविकास आघाडी (ठाकरे गट, शरद पवार गट, काँग्रेस) आणखीनच दुबळी झाली आहे. राज्यातील महायुतीला केंद्रातील भाजप सरकारचा भरभक्कम पाठिंबा लाभलेला आहे. सत्ताधार्यांनी लोकसभा निवडणुकीआधी एक ना अनेक विकासकामांचा धडाका लावला आहे. या विकासकामांच्या उद्घाटनासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी महिनाभरात महाराष्ट्राच्या दोन दोनदा चकरा मारत आहेत. राज्यातील सर्वसामान्य जनतेला आकर्षित करण्यासाठी कुठलीच कसर न सोडणार्या सत्ताधार्यांच्या मनात मात्र जनमत आपल्या बाजूने आहे काय? याबाबत अजूनही शंकेची पाल चुकचुकत आहे.

मराठा साम्राज्याचा सेनापतीः तानाजी मालुसरे !

नरवीर तानाजी मालुसरे प्राणार्पण दिन

सिंहगडची लढाई दि.४ फेब्रुवारी १६७० रोजी सिंहगड किल्ल्यावर, त्या काळात कोंढाणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोंढिन्यात रात्री दरम्यान झाली. मराठा साम्राज्याचा सेनापती तानाजी मालुसरे आणि सिंहगडचा राजपूत किल्लेदार उदयभानसिंग राठोड यांच्यात लढाई झाली. त्यातच नरवीर तानाजींने आपले प्राणार्पण केले. पुढे वाचा, श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर संकलित लेखात ज्ञानवर्धक माहिती...

– संपादक.

नरवीर तानाजी मालुसरे यांचा जन्म सन १६२६ साली गोडवली जि.सातारा येथे झाला. हे शिवाजी महाराजांच्या सैन्यातील एक सुभेदार व शिवाजी महाराजांचे बालपणीचे सवंगडी होते. तानाजीने महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेपासूनच अनेक महत्त्वाच्या घडामोडीत सहभाग घेतला होता. नरवीर तानाजी मालुसरे यांचे एक स्मारक रायगड मधील महाड तालुक्यामध्ये असणाऱ्या आंबेशिवथर गावामध्ये सर्व ग्रामस्थांच्या तसेच भारतीय लष्करामध्ये कार्यरत असणाऱ्या सैनिकांनी व गावातील शहरात असणाऱ्या नोकरदार वर्गाने पुढाकार घेऊन आपल्या वैयक्तिक निधीतून उभे करण्यात आले आहे. हे स्थान महाड पासून ३० किमी अंतरावर निसर्गसानिद्यात आहे. सातारा जिल्ह्यातील गोडवली गावात त्यांचे बालपण गेले. लहान पणापासूनच डोंगरदऱ्यांची माहिती असलेला हा तरुण. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे तारुण्य उंबरठ म्हणजेच त्यांचा शेलारमामा यांच्या गावी गेले. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी महाराजांनी काही निवडक सरदारांना प्रत्येकी हजार मावळ्यांचे सैन्य दिले होते. तानाजींनी या सैन्याच्या बरोबरीने खानाच्या फौजेवर तुटून पडून उत्तम कामगिरी बजावली होती. तानाजींचा मृतदेह किल्ल्यावरून ज्या मार्गाने कोकणात नेला त्या मार्गाला मढे घाट म्हणतात. स्वराज्यातील रायगडाच्या बाजूला, कोकण पट्ट्यात असणाऱ्या स्थानिक दंगलखोर जमातींचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी महाराजांनी तानाजींवर सोपविली होती. त्यासाठीच या भागातील उमरठ या गावात येऊन ते राहिले होते. आपलेपणाने वागून या भागातील लोकांना स्वराज्याच्या कार्यात त्यांनी सहभागी करून घेतले.

सिंहगडची लढाई दि.४ फेब्रुवारी १६७० रोजी सिंहगड किल्ल्यावर, त्या काळात कोंढाणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोंढिन्यात रात्री दरम्यान झाली. मराठा साम्राज्याचा सेनापती तानाजी मालुसरे आणि सिंहगडचा राजपूत किल्लेदार उदयभानसिंग राठोड यांच्यात लढाई झाली. वेढा घेण्याच्या वेळी तानाजीने यशवंत घोरपडेच्या मदतीने किल्ल्याकडे जाणाऱ्या एका उंच खडकावर पचला. गडावर चढताना मराठ्यांना पहारेकऱ्यांनी रोखले होते आणि यावेळी पहारेकरी व काही घुसखोर यांच्यात लढाई झाली. उदयभान आणि तानाजी एकाच युद्धात गुंतले. उदयभानने तानाजीची ढाल फोडली आणि त्याची भरपाई केली. त्याने त्याच्या शेजारीच आपल्या पगडीचे कपड लपेटले आणि लढाई सुरूच ठेवली, लवकरच थोड्यावेळ उदयभानने त्याचे कवच तोडले. पण तानाजीने त्याचा सामना केला, ते दोघे युद्धामध्ये मारले गेले. दुसऱ्या मार्गावरून किल्ल्यावर प्रवेश केल्यावर मराठा सैन्याने किल्ला ताब्यात घेतला.

नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या जीवनावरील आधारित तान्हाजी चित्रपट रिलीज झालाय. सिनेमा सगळीकडेच गर्दी खेचतोय. या निमित्ताने नरवीर तानाजी मालुसरे आणि त्यांच्या वंशजांविषयी कुतूहल आहे. त्यांचे वंशज कोण आहेत? ते काय करतात? त्यांचे वास्तव्य कोठे आहे? याबाबत माहिती मिळवण्यासाठी अनेकजण प्रयत्न करीत आहेत. नरवीर तानाजी मालुसरे यांचे थेट बारावे

*** संकलन व शब्दांकन ***
श्री कृष्णकुमार आनंदी
गोविंदा निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

वंशज कै.शिवराज बाळकृष्ण मालुसरे यांच्या पत्नी डॉ.शीतल मालुसरे व त्यांचे पुत्र रायबा हे सध्या रायगड जिल्ह्यातील महाड येथे वास्तव्याला आहेत. डॉ.शीतल मालुसरे महाड येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत, तर मुलगा पुण्यात शिक्षण घेत आहे. डॉ.शीतल यांनी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या इतिहासावर पीएचडी पूर्ण केली आहे. तसेच त्या राज्यात आणि राज्याबाहेर छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या जीवनावर व्याख्याने देतात. तसेच कवियत्री म्हणून त्यांनी साहित्य क्षेत्रात स्वत:चा असा ठसा उमटवला आहे. तानाजींचे मूळ गाव कोणते? मालुसरे परिवार मुळचा कुठला? त्यांची पार्श्वभूमी काय? तानाजी मालुसरे यांच्या परिवाराचे पुढे काय झाले? याबद्दल जाणून घेण्याची अनेकांमध्ये उत्सुकता आहे. मालुसरे परिवार हा मूळचा पाचगणी जवळील गोडोली गावचा. तानाजी मालुसरे यांचे वडील काळोजीराव यांचे तेथे वास्तव्य होते. तानाजी मालुसरे यांचे बालपण गोडोली येथे गेले. शिवरायांनी बालपणातच स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली तेव्हापासूनच तानाजी मालुसरे शिवरायांच्या सोबतच होते. तेथून पुढे शिवरायांच्या अनेक मोहिमा, लढायांमध्ये विश्वासू सहकारी म्हणून तानाजी सहभागी असत. त्यांच्यातील स्वराज्यनिष्ठा व लढवय्येपणा हेरून शिवरायांनी त्यांना महाबळेश्वर–पोलादपूर परिसरातील बंदोबस्ताची जबाबदारी सोपवली होती. त्यावेळी या भागात दरोडेखोरांचा मोठा उपद्रव वाढला होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उमरठ या गावी ते आपल्या परिवारासह स्थायिक झाले. नंतर सन १६५९मध्ये प्रतापगडावर शिवराय व अफजलखान यांच्याबरोबर झालेल्या युद्धात त्यांनी अफजल खानाच्या सैन्याचा समाचार घेतला होता. नरवीर तानाजी अजरामर झाले ते सिंहगडाच्या लढाईत. सन १६६५मध्ये झालेल्या पुरंदराच्या मिर्झाराजे जयसिंगाबरोबर झालेल्या तहानुसार स्वराज्यातील २३ गड–किल्ले औरंगजेबाला द्यावे लागले होते. त्यात सिंहगडाचा देखील समावेश होता. परंतु पुढे महाराज मोठ्या शिताफतीने आग्र्याच्या कैदेतून सुटून आले. तहात दिलेले सर्व गड–किल्ले परत स्वराज्यात सामील करण्याचा सपाटा त्यांनी लावला.

राजगड मुक्कामी असताना राजमाता जिजाऊ व शिवरायांना समोरील सिंहगड पारतंत्र्यात असल्याची खंत होती. त्यावेळी गडाचे नाव कोंढाणा होते. महाराजांचा मनसुबा ऐकून लढवय्या तानाजी मालुसरे यांचा मराठी बाणा जागृत झाला. आधी लगीन कोंढाण्याचे मग माझ्या रायबाचे, असे म्हणत सिंहगड स्वराज्यात आणण्याचा विडा त्यांनी उचलला. अष्टमीच्या काळोखात तानाजी मोजक्या मावळ्यांसह गड घेण्यासाठी डोणागिरिच्या कड्याला बिलगले. युद्धात तानाजी व उदयभान हे दोन वीर समोरासमोर आले. या दोन लढावया योद्धामध्ये घनघोर युद्ध झाले. दि.४ फेब्रुवारी १६७० रोजी सिंहगडावर उदयभानच्या एका वाराने तानाजी धारातीर्थी पडले. भाऊ सूर्याजी व शेलार मामा यांनी चवताळून उदयभानाच्या फौजेचा धुव्वा उडवला. उदयभानाचा खात्मा करून गडावर भगवा निशाण चढवून गड स्वराज्यात दाखल केला. स्वराज्यासाठी तळहातावर शीर घेऊन लढणाऱ्या मावळ्यांना युद्धात वीर मरण आले, तर त्यांच्या पश्चात त्याच्या कुटुंबाची सर्व जबाबदारी महाराजकडून नेहमीच घेतली जात असे. त्यानुसार पुढील काही महिन्यातच तानाजी मालुसरे यांच्या मुलाचे रायबाचे लग्न यथोचित पार पाडले. त्यास बेळगाव जवळील पारगडची किल्लेदारी दिली. मालुसरे घराण्याचे व स्वराज्याचे नाते अधिक घट्ट केले. त्यावेळी उमरठचे मालुसरे कुटुंबीय व काही लोक पारगड येथे स्थलांतरित झाले. अलीकडच्या काळात पारगडचे मालुसरे कुटुंब शिक्षणासाठी व उदरनिर्वाहासाठी बेळगाव, महाडला स्थायिक झाले आहेत.

!! नरवीर तानाजी मालुसरेजींना स्मृतिदिनी मानाचा लवून मुजरा!!

ठराव ..

मराठी पडते मागे
संम्मेलनात ठराव
धरणाला पडे तडे
कसा घाले भराव

बेडूक फुगा फुगून
करते डराव डराव
मायमराठी शेवटी
इंग्रजी करी सराव

आरोप प्रत्यारोप
एकमेकांवर घाव
चर्चा मिर्च्या झोंबे
चालले काव काव

परि संवाद जोरात
रंगे साहित्यबनाव
कागदी घोडे नाचे
कृतीत का अभाव

काळजी मनामध्ये
कसा लागे निभाव
बाकीभाषांचे लाड
किंमत देतो बेभाव

भाषेचा कळवळा
दिखावू आविर्भाव
अनुकरणात मात्र
दिसे अन्योन्यभाव

मराठीचंअभिजात
घोषणाबाजउठाव
कुठे आवाज हरवे
हे परमेश्वरास ठाव

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..
www.kavyakusum.com

जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट!

दैं.जनप्रभात

जागतिक कर्करोग दिन हा दि.४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक कर्करोग दिन सन २००८मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या नेतृत्वात आहे. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे, हे आहे आणि कॅन्सरपासून बचाव करता येणाऱ्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संधी आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाडरे पाळला जातो. जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहितीला लक्ष्य करतो, जागरूकता वाढवतो आणि कलंक कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने प्रभावित झालेल्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. यापैकी एक चळवळ आहे नो हेअर सेल्फी, कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी धैर्याचे प्रतीक दर्शविण्यासाठी ''केशकर्तनकर्त्यांनी'' त्यांचे डोके शारीरिक किंवा अक्षरश: मुंडन करण्याची जागतिक चळवळ आहे. सहभागींच्या प्रतिमा नंतर सर्व सोशल मीडियावर शेअर केल्या जातात. जगभरात शेकडो कार्यक्रमही होतात. जागतिक कर्करोग दिनाची स्थापना दि.४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद, जी संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रूग्ण सेवा सुधारण्यासाठी तयार करण्यात आली होती, त्यामध्ये दस्तऐवजाच्या अधिकृत स्वाक्षरीची वर्धापनदिन जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, त्यावर तत्कालीन जनरल यांनी समिटमध्ये स्वाक्षरी केली होती. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २०००मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पॅरिसच्या कर्करोगविषयक सनदेला मान्यता दिली. प्रस्तुत सनद कर्करोगसंबंधित संशोधन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता आर्थिक गुंतवणूक करणे, कर्करोगग्रस्त रूग्णांचे जीवनमूल्य उंचावणे तसेच त्यांना योग्य उपचार देणे अशा तत्त्वांचा पुरस्कार करते. सनदेच्या दहाव्या कलमात अधिकृतरीत्या ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून जाहीर केला गेला.

आपण डाक्टर वगैरे काही नसलो तरी समाजाला काहीतरी देणेकरी लागतो, म्हणूनच हा छोटा–सा खारीचा वाटा. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २००० मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बोधप्रद संकलित लेख श्रीकृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांतून जरुर वाचा... संपादक....

कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यांत झालेली लक्षणीय प्रगती यांमुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे. परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते. यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटना जागतिक कर्करोग दिवस साजरा करतात. कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू हे अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना–युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोल–यूआईसीसी ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेखा– थीम्स जाहीर करते. या रूपरेखेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांडरे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांडरे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांडरे ४ फेब्रुवारी किंवा त्या आठवड्यात कर्करोगविषयक विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.जागतिक कर्करोग दिवसानिमित्त सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांतून कर्करोगाचा जनजीवनावरील परिणाम कमी करता येऊ शकतो, या आशयाशी संलग्न रूपरेखा आखण्यात आली. तसेच कर्करोगाबाबत गैरसमज दूर करणे; कर्करोग हा प्रतिबंधात्मक आजार आहे; कर्करोगाविषयी वैयक्तिक बांधीलकी, अशा विविध विषयांना अनुसरून देखील रूपरेखा योजण्यात येतात. भारतामध्ये सन २०१४ पासून ७ नोव्हेंबर यादिवशी राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिवस साजरा करण्यात येतो. !! जागतिक कर्करोग दिनानिमित्त सर्वांना दक्षतावर्धक हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

– संकलन व सुलेखन –श्री कृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे गुरूजी.रामनगर वॉर्ड, गडचिरोली.फक्त दूरध्वनी– ७१३२७९६६८३.
(विश्व कर्करोग दिन विशेष.)

पोकळी ...

माणूस जाता बोले
निर्माण हो पोकळी
फूल राहे आहे तसे
गळते एक पाकळी

जाणारे बंधन मुक्त
बाकी गर्दी मोकळी
जाणारा सोन्या सम
प्रवृत्ती मात्र पितळी

जाणारा असा तसा
कुणी करतो टकळी
जमवा जमवी चाले
मडकी बांबू सुतळी

ओक्साबोक्शी रडते
लोक दगडी कातळी
दिवा अचानक विझे
वाती वरती काजळी

क्षणभंगुरजीवन असे
अक्कल का पाजळी
गळून गेले पाणीसारे
रिकामी होई ओंजळी

निघून जाई दु:खजरा
करता अंति आंघोळी
डोळे होतात कोरडे ते
आसवे खालीओघळी


चालूपुन्हा होई जीवन
पालवी फुटे नव्हाळी
जाणारा रे पडद्याआड
विसरून गेली कुटाळी

हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..
www.kavyakusum.com

जिद्द व मेहनतीचे नाव म्हणजे – दिलीप बनसोडे

दैं.जनप्रभात

दिलीप बनसोडे सर जवळपास ३२ वर्षे सेवा करून ३१ मार्च २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्याबद्दल त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!!! बनसोडे सरांचे मूळ गाव माळेगाव ता. अहमदपूर असून त्यांचा जन्म आई मालनबाई व वडील विठ्ठलराव यांच्या पोटी १४ मार्च १९६६ रोजी झाला .घरची परिस्थिती फारशी चांगली नव्हती जातीव्यवस्थेचे चटके सहन करत आई–वडिलांनी त्यांना गावातच चौथीपर्यंत शिक्षण दिले. पुढील शिक्षणाची सोय नसल्याने त्यांना मामाकडे माळाकोळी येथे ठेवण्यात आले. तिथून ते दहावी पास झाले व पुढील शिक्षण अहमदपूर व नांदेड येथे झाले ,ते एम ए इंग्लिश बीएड एलएलबी आहेत १९९३ ला ते श्री .महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक म्हणून रुजू झाले. मी तेथे अगोदर सेवेत होतो आणि बनसोडे सरांची माझी अगोदरच ओळख होती. त्यामुळे ते काही दिवस आमच्या घरी राहिले ,सात वर्षे तेथे नोकरी करून त्यांनी विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून नाव कमविले होते. नंतर त्यांची बदली येस्तार येथील साने गुरुजी विद्यालयात झाली तेथे शाळेच्या नावाप्रमाणेच साधी राहणे व उच्च विचारसरणी प्रमाणे राहिले ,इंग्रजी सारखा अवघड विशेष सोपा करून ग्रामीण भागातील मुलांकडे विशेष लक्ष दिले स्वतः त्या गावात राहिले, त्याचा परिणाम असा झाला की; साने गुरुजी विद्यालय या शाळेचा एस.एस.सी. चा निकाल सतत सात वर्ष १००% टक्के लागला. त्यांचा विशेष गौरव झाला .संस्थेने सरांमधील गुणवत्ता पाहून संत भगवान बाबा विद्यालय धामणगाव ता. शिरूर अनंतपाळ येथे मुख्याध्यापक पदी बढती दिली. तेथील शाळा देखील सरांनी नावावर रूपाला आणली, तेथेच शेवटपर्यंत सेवा करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत .सरांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे; त्यांचे विषयावर प्रभुत्व हे तर वाखाण्याजोगे आहे. त्यांनी अनेक इंग्रजी विषयाचे विषय तज्ञ ,मार्गदर्शन म्हणून प्रशिक्षण दिले आहे . त्यांना खेळाची खूप आवड आहे. त्यांनी अनेक वेळा समाजसेवेत भाग घेतला ;त्यांचे अनेक विद्यार्थी अनेक विविध क्षेत्रात उच्च पदावर काम करत आहेत. त्यांनी अनेक गरीब विद्यार्थ्यांना मदत केली आहे. अनेक विद्यार्थी घडविले आहेत यापैकी एक शिष्य व्यंकट दंतराव , हा सर्वांपेक्षा सर्वच निघाला आहे, असे अनेक उदाहरणे देता येतील. ज्या संस्थेत बनसोडे सर सेवेत आहेत त्या संस्थेचे संस्थाचालक शिक्षणमहर्षी व दलित मित्र श्री .डी .बी .लोहारे गुरुजी आहेत. ते स्वामी रामानंद तीर्थ, गोविंद भाई गोविंदभाई सराफ यांच्या सानिध्यात वाढलेत ,त्यांच्या कार्याचा लोहारे गुरुजींवर खूप प्रभाव होता , तोच प्रभाव बनसोडे सरांवर झाला त्यांच्यावर गुरुजींनी फार विश्वास ठेवून खूप



मोठी जबाबदारी दिली ती बनसोडे सरांनी अतिशय चोखपणे पार पाडली .असे संस्थाचालक फार कमी आहेत की ;ज्यांचा आदर्श समोर ठेवावा त्यामधील लोहारे गुरुजी एकआहेत .सरांच्या जडणघडणीमध्ये त्यांच्या आईचा फार मोठा वाटा आहे. त्यांची आई फार धाडसी व कर्तुत्वान होती .त्या माळेगावच्या सरपंच होत्या ;त्यावेळी ग्राम स्वच्छता स्पर्धेत भाग घेतला व सरांच्या मार्गदर्शनाखाली ते गाव तालुक्यात प्रथम आले .सर आणि मी धनेगाव येथे राहायला शेजारी होतो त्यांचा फार जवळून सहवास लाभला ते आमच्या घरातील एक सदस्य होते ते प्रेमळ सुसंस्कृत होते. त्यांचा विवाह झाला .त्यांना दोन मुले आहेत पत्नी देखील लातूर येथे सेवेत आहे. गावाकडे ही कुटुंब सदन आहे .त्यांच्यावर अनेक जीव घेणे ,वाईट ,कठीण प्रसंग आले ते हार न मानता अतिशय खंबीरपणे येणाऱ्या संकटांना सामोरे गेले . व त्याच्यावर सहजपणे मात केली .त्यामुळे ते गंभीर आजारातून लवकर बरे झाले. असा जिदि व मेहनती हाडाचा शिक्षक ३१ मार्च २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहे. त्यांच्या पुढील कार्याला व यशस्वी वाटचालीला कांबळे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छ !

रामराव माधवराव कांबळे
(सेवानिवृत्त प्राध्यापक)श्री महादेव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय धनेगाव ता.देवणी. जिल्हा. लातूर

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242

शासनाकडून सोलापूर महापालिकेला उजनी पाईप लाईनसाठी २६७ कोटींचा निधी देणार अजित पवार

सांगोल्याच्या धरतीवर अन्य प्रादेशिक पाणीपुरवठा योजना राबववून लोकांना पाणीपुरवठा करावा...
टंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन बियाणे महामंडळाने सोलापूर जिल्ह्याला चारा बियाणे प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे...
जिल्ह्यात महिला व बाल विकास भवन निर्माण करा;प्रत्येक शासकीय कार्यालयासाठी सोलर पॅनल बसवून कार्यालयाचा वीज खर्च कमी करावा...
पंढरपूर देवस्थान आराखड्यातर्गंत कामे करत असताना लोकभावना लक्षात ठेवून कामांमध्ये नाविन्यता आणावी...

दैं.जनप्रभात
सोलापूर, /प्रतिनिधी

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सोलापूर महापालिकेला उजनी येथून पाईपलाईन टाकण्यासाठी आवश्यक असलेला राज्य शासनाचा २६७ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यातील सुमारे ९० कोटींचा पहिला हप्ता पुढील दोन दिवसांत देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिली. नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित सोलापूर जिल्ह्यातील विविध विकास कामांच्या आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार बोलत होते. यावेळी आमदार यशवंत माने, आमदार संजय शिंदे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल तेली–उगले, शहर पोलिस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, एमजीपीचे कार्यकारी अभियंता अनिल पाटील, माजी आमदार दीपक साळुंखे यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी, सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उजनी धरणातून १७० दशलक्ष लिटर पाणी सोलापूर शहराला दररोज आणण्यासाठी ८९४ कोटींचा प्रकल्प मंजूर केलेला आहे. या अंतर्गत कामे सुरू आहेत. राज्य शासनाचा २६७ कोटींचा हिस्सा लवकरच देण्यात येणार असून, त्यातील पहिला टप्पा सुमारे ९० कोटी पुढील दोन दिवसात उपलब्ध करून देण्यात येतील. तरी महापालिकेने या अनुषंगाने पुढील कामे त्वरित पूर्ण करून सोलापूर शहरातील नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगितले. सोलापूर शहर महापालिकेला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून जुना पुना नाका ते पत्रकार भवन व जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला असे दोन उड्डाणपूल मंजूर असून भूसंपादनासाठी १०१ कोटींचा शासन हिस्साही लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उजनी धरण पाणीपातळी कमी झाल्याने शहरातील लोकांना नळाडरे पाणीपुरवठा करण्यासाठी दुबार व तिबार पंपिंग महापालिकेला करावे लागते, त्यासाठी आवश्यक असलेला ३.५४ कोटीचा तर हुतात्मा स्मृती मंदिराच्या नूतनीकरणासाठी ३.३६ कोटीचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सांगितले.यावर्षी पाऊस कमी झाल्याने जिल्ह्यात टंचाईसदृश्य परिस्थिती आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत ज्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरू आहेत त्यातून प्रत्येक गावात पाणीपुरवठा झाला पाहिजे यासाठी सांगोला प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चांगल्या प्रकारे चालवली जात आहे, तरी याच धरतीवर जिल्ह्यातील सर्व प्रादेशिक पाणीपुरवठा योजना संबंधित यंत्रणांनी चालवल्या पाहिजेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिले. तसेच जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन प्रत्येक गावात आवश्यक त्या ठिकाणी पाणमीपुरवठा उपाययोजना कराव्यात. तसेच जनावरांना माहे जून २०२४ अखेरपर्यंत चारा उपलब्ध होईल यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश देतानाच बियाणे महामंडळाने टंचाई परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सोलापूर जिल्ह्याला चारा बियाणे तात्काळ उपलब्ध करून द्यावे, असेही निर्देशित केले. पंढरपूर देवस्थान आराखड्यातर्गंत ७३ कोटींचा निधी मंजूर असून, याअंतर्गत पुरातत्व विभाग काम करत असून माहे मार्च २०२४ पर्यंत त्यांना आवश्यक असलेला पाच कोटीचा निधी त्वरित देण्यात येत आहे. या अंतर्गत कामे करत असताना पुरातत्व विभागाने लोकभावना लक्षात घेऊन कामामध्ये वेगळेपणा व नाविन्यता आणावी. यासाठी उज्जैन, अयोध्या व वाराणसी येथे जाऊन तेथील मंदिराचे केलेले नूतनीकरण कामाची पाहणी करून माहिती घ्यावी व त्या पद्धतीने येथील श्री विठ्ठल – रुक्मिणी मंदिरामध्ये कशा पद्धतीने चांगल्या व दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केल्या.जिल्ह्यात महिला व बाल विकास भवन निर्माण करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा. यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध करून घ्यावी. याठिकाणी महिला बचत गटांच्या वस्तूंच्या विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयास सोलर पॅनल बसवण्याबाबत आराखडा तयार करावा व प्रत्येक शासकीय कार्यालयात सोलर पॅनल बसवून विजेवरील खर्च कमी करावा. होटगी रोड विमानतळ येथे सुरू असलेली कामे त्वरित मार्गी लावून हे विमानतळ लवकर सुरू करण्याबाबत प्रशासनाने प्रयत्न करावेत. तसेच जिल्हा नियोजन समितीचा मंजूर असलेला ४९० कोटींचा निधी आचारसंहिता लागण्यापूर्वी शंभर टक्के खर्च होईल यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील पाणी व चारा टंचाईच्या अनुषंगाने माहिती दिली. जिल्ह्यातील पाच तालुके(बार्शी, माळशिरस, सांगोला, करमाळा व माढा) दुष्काळी तालुके म्हणून जाहीर केलेले असून ४५ महसूल मंडळातही दुष्काळ जाहीर केलेला आहे. प्रशासनाने ५५ कोटीचा टंचाई आराखडा तयार केलेला असून सद्यस्थितीमध्ये चार गावांमध्ये चार टँकरने पाणीपुरवठा सुरू असून, पुढील ११५ दिवस पुरेल एवढा चारा जिल्ह्यात उपलब्ध आहे. तर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून चारा बियाण्यांसाठी ८ कोटीचा निधी मंजूर केलेला असून त्यातील ३.५० कोटीच्या निधीतून चारा बियाणे खरेदी केले असून उर्वरित ४.५० कोटी निधी त्वरित पशुसंवर्धन विभागाला चारा खरेदीसाठी उपलब्ध केला जाणार आहे. जिल्हा प्रशासन पाणी व चारा टंचाई परिस्थितीवर लक्ष ठेवून असून जिल्ह्यात कोठेही पाणी अथवा चाऱ्याची टंचाई भासणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा नियोजन समितीचा मंजूर असलेला निधी शंभर टक्के खर्च होईल यासाठी नियोजन केल्याची माहितीही त्यांनी दिली.महापालिका आयुक्त शितल तेली–उगले यांनी सोलापूर महापालिकेच्यावतीने करण्यात येत असलेल्या विविध विकास कामांची तसेच एसटीपी प्रकल्प, ड्रेनेज प्रकल्प व वाढीव पाणीपुरवठा योजना, रस्ते तसेच उड्डाणपुलाच्या कामांची माहिती दिली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांनी जिल्हा परिषद अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती बैठकीत सादर केली. तर तेजस्विनी आफळे यांनी पंढरपूर देवस्थान विकास आराखड्याची माहिती दिली.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली

जलसंधारणाची कामे करुन मतदार संघात हरित क्रांती केली : ना. संजय बनसोडे

दैं.जनप्रभात
उपसंपादक राठोड रमेश पंडित

उदगीरः- आपला भाग हा दुष्काळी असल्याने या भागात पाण्याचे प्रमाण कमी होते. या भागाचा अभ्यास करुन एक मास्टर प्लॉन तयार केला. या परिसरात मागील ४० वर्षापूर्वी बंधारे झाले होते. त्याची अतिशय दुरावस्था झाल्याने या भागातील शेतक–यांना त्याचा फायदा होत नव्हता हि बाब लक्षात आल्यानंतर उदगीर तालुक्यातील कासराळ – ३, सुमठाणा – २ , वाघदरी – २, टाकळी – २, कौळखेड – १ , चांदेगाव – १ असे एकुण ११ कोल्हापुरी बंधारे मंजूर करुन घेतले त्यात आरनाळ येथील एका साठवण तलावाचाही समावेश आहे १ साठवण तलाव व ११ कोल्हापुरी बंधाऱ्यासाठी एकुण ३० कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला आहे. या बंधाऱ्यामुळे उदगीर तालुक्यातील ४५० हेक्टर क्षेत्र हे सिंचनाखाली येणार असुन या भागातील पाणीटंचाई ही कमी होणार आहे. या कोल्हापुरी बंधाऱ्यांमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती होवुन त्यांचे जीवनमान उंचावेल म्हणून जलसंधारणाची कामे करुन मतदार संघात हरित क्रांती केली असल्याचे मत क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.ते मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने आयोजीत उदगीर तालुक्यातील मौजे कासराळ येथील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या भुमीपुजन सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार रामेश्वर गोरे, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, महावितरणचे सायस दराडे, वाढवणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.एस. गायकवाड, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल कांबळे, कासराळचे सरपंच दयासागर यळ्ळावाड, ज्ञानोबा शेळके, सुरेखा पाटील, भरत चामले, ब्रम्हाजी केंद्रे, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, सय्यद जानीमियाँ, फय्याज शेख, इब्राहिम पटेल, बाळासाहेब मरलापल्ले, नवनाथ गायकवाड, शशिकांत बनसोडे, नागेश थोंटे, संजय पवार, बालाजी भोसले, बस्वराज रोडगे, प्रशांत चामे, प्रभाकर पाटील, वसंत पाटील आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मतदार संघात नागरीकांना लागणा–या सर्व सुख – सुविधा उपलब्ध करुन देवुन उदगीरच्या विकासाचा नवा पॅटर्न महाराष्ट्रात निर्माण केला. आणखी नविन ७ कोल्हापुरी बंधारे मंजूर केले असुन यामध्ये धडकनाळ – २ , बोरगाव – १, लिंबगाव – १ देवर्जन – १ नळगीर – १, नागलगाव – १ असा एकुण ७ कोल्हापुरी बंधाऱ्यांसाठी १० कोटी ६९ लक्ष रुपये मंजूर केले असुन त्याची निविदा प्रक्रिया चालु आहे. लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचेही ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.मतदार संघात



जलसंपदा विभागातुन सिंचनाचे प्रश्न सोडवले आहेत. त्यामध्ये आजपर्यंत ६० कोटींची कामे झाली असुन१४२ कोटींची कामे अजुन प्रस्तावित आहेत. मंजूर झालेली सर्व कामे वेळेत व दर्जेदार करण्याचे निर्देश ही ना.बनसोडे यांनी दिले. गाव समृध्द झाले तर तालुका समृध्द व जिल्हा मग महाराष्ट्र राज्य त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येवून आपल्या भागाचा विकास करावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्याम डावळे यांनी केले तर आभार गोपाळ पाटील यांनी मानले.यावेळी नागलगाव, टाकळी, चांदेगाव, लिंबगाव, वागदरी, धडकनाळ, बोरगावसह परिसरातील ग्रामस्थ व प्रतिष्ठित नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा आरक्षण सल्लागार समितीची बैठक संपन्न

दैं.जनप्रभात
मुंबई /वृत्तसेवा



मराठा आरक्षणकरिता झालेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने जारी करण्यात आलेली सगेसोयरेबाबतची अधिसूचना, त्याचबरोबर आतापर्यंत केलेली कार्यवाही, आरक्षणबाबत विविध न्यायालयातील याचिकांबाबत चर्चा करुन सर्वे क्षणाचे काम करणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचारी यांचे न्यायमूर्ती डी.बी. भोसले (निवृत्त) यांनी अभिनंदन केले. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने नेमलेल्या न्यायमूर्ती भोसले (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या निवृत्त न्यायमूर्तींच्या समितीची आज सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली.न्यायमूर्ती भोसले (निवृत्त) यांनी राज्य मागासवर्ग आयोग आणि त्यांची संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा तसेच ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केले. त्या सर्वेक्षण करणाऱ्या सर्व सदस्यांचे कौतुक केले. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचे तसेच मोठ्या प्रमाणातील नोंदी शोधण्याकरीता कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक केले.या बैठकीमध्ये न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीने केलेल्या आतापर्यंतच्या कार्यवाहीचा आढावा घेतला. कुणबी नोंदी शोधण्याकरिता करत असलेले विशेष कक्षामार्फतची कार्यवाही, तसेच समितीचा पहिला आणि दुसरा अहवाल दिल्यानंतर समितीच्या कालावधीत शोधलेल्या विविध नोंदी असणाऱ्या कुणबी वारसदारांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत आणि समितीस देण्यात आलेल्या मुदत वाढीपर्यंत करावयाची कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा झाली. न्या. भोसले यांनी आंदोलनाच्या अनुषंगाने ज्या कुशलतेने सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि त्यांच्या संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेने हाताळलेले कौशल्य याबद्दल त्यांचे अभिनंदन करून धन्यवाद दिले. या बैठकीस न्या. मारोतराव गायकवाड, (निवृत्त) न्या. संदीप शिंदे (निवृत्त) उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, सुवर्णा केवले, आरक्षणाच्या अनुषंगाने नेमण्यात आलेले विधीज्ञ अभिजित पाटील, वैभव सुखदरे आणि अक्षय शिंदे यांच्यासह संबंधित विभागातील मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, उपस्थित होते.

अवैध वाळू उपसा व साठवनूकी विरोधात महसूल विभागाची धडक कारवाई



दैं.जनप्रभात
ता. प्रतिनिधी / अमोल झाडे

समुद्रपुरः- नदिला पाणी जास्त असल्याने अद्यापही शासकीय रेतीडेपो खुल्ले झाले नसल्याने बांधकामासाठी नागरिकांना रेती दुर्मिळ झाली आहेत.याचाच फायदा घेऊन अवैध वाळू , उपसा, साठवण वाहतूक करीत आहे.यावर स्थानिक महसूल विभागाची अवैध वाळू उपसा साठवण व वाहतूकीवर करडी नजर असुन तहसिलदार कपिल हाटकर यांच्या मार्गदर्शनात महसूल विभागाच्या वतीने निरगुडी शिवारात नदी ठिकाणी अवैध वाळू उपसा करुन साठवून करुन ठेवलेला २५ ते ३० ब्रास वाळूसाठा जप्त केला आहे.आठवड्याळ भरऱ्यात पथकाची हि दुसरी कारवाई असुन २४ जानेवारी भोसा येथे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालक व मालकावर सिंदी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी २ फेब्रुवारीला महसूल विभागाचे पथक गस्तीवर असताना वणा नदीच्या काठावर निरगुडी शिवारात अवैध वाळूची मोकळ्या जागेवर साठवून करून असल्याचे आढळले याची माहिती पथकाने तहसिलदार कपिल हाटकर यांना देताच तहसिलदारांनी साठवून केलेल्या वाळूसाठा जप्त करण्याचे आदेश दिले यावेळी पथकातील मंडळ अधिकारी प्रशांत निनावे तलाठी मयूर कुटे, तलाठी गजानन ठाकरे व कोतवाल कवडु धुर्वे यांनी घटनास्थाळी जाऊन अंदाजे २५ ते ३० ब्रास रेती साठा जप्त करून समुद्रपुरचे तहसील कार्यालयात जमा केला. आठवड्याभरऱ्यातील हि दुसरी कारवाई असून २४ जानेवारी भोसा रस्त्यावर अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालक मालकावर सिंदी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.. नद्यांना पाणी असल्यामुळे शासनाकडून अद्याप शासकीय रेतीडेपो खुल्ले करण्यात आले नाही त्यातच फायदा अवैध वाळू उपसा साठवण व वाहतूकी करणारे घेत असुन अवासवा भावाने लपवून झेपुन वाळूची विक्री करीत आहे.मात्र तहसिलदार कपिल हाटकर यांच्या पथकाकडून करडी नजर ठेवली आहे.तरी देखील शासनाकडून तातडीने रेतीडेपो खुल्ले करुण नागरिकांना रखडलेल्या बांधकामासाठी वाळू उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

गवंडीत आमदार केचेचा भव्य सत्कार

श्रीमंत किल्लेवाले दारबाराला ; तीर्थक्षेत्र 'क' दर्जा मिळाला

* यावेळी परी चांदशहा अली उर्फ श्रीमंत किल्लेवाले सरकार कमिटी यांच्याकडून आमदार दादाराव केचे थाटात सत्कार सोहळा पार पडला.यावेळी कमिटी व समस्त गावकरी उपस्थित होते. यापुढे कोटींचा निधी देणार - आमदार केचे

==========

* श्रीमंत किल्लेवाले सरकार दरबाराचा विकास होणार आहे.यापूर्वी येथे आमदार निधी, २५१५ यानिधीतून विकास केला.आता याला तीर्थक्षेत्र दर्जा दिला आहे.येथे गोरगरिबांच्या लोकांच्या हितासाठी सभागृह मंजूर करून देण्यात येईल त्यासाठी कोटीचा निधी मंजूर करून आणून असे वक्तव्य आमदार दादाराव केचे यांनी केले.

दैं.जनप्रभात
कारंजा/ प्रतिनिधी

: तालुक्यातील गवंडी येथील पिर चांदशाहा अली उर्फ श्रीमंत किल्लेवाले सरकार दरबाराला नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन बैठकीत तीर्थक्षेत्र 'क' दर्जा मंजूर केला गेला आहे.गवंडी येथील किल्लेवाले सरकार दरबारला तीर्थक्षेत्र दर्जा देण्यासाठी आर्वी मतदारसंघाचे विकासपुरुष आमदार दादाराव केचे यांनी प्रयन्त केले. तीर्थक्षेत्र 'क' दर्जा मिळवण्यासाठी श्रीमंत किल्लेवाले सरकार कमिटी ने अथक प्रयत्न करून हा दर्जा प्राप्त केला. वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत तात्काळ मंजुरी दिल्याने गवंडी येथील श्रीमंत किल्लेवाले सरकार कमिटीने आभार मानले.

यानिमित्त विकासपुरुष आमदार दादाराव केचे यांचे श्रीमंत किल्लेवाले सरकार दरबारमध्ये कमिटी व गावातर्फे भव्यदिव्य सत्कार घेण्यात आला. यावेळी शेकडो नागरिकांच्या उपस्थित हा सत्कार सोहळा संपन्न झाला. तालुका भाजप अध्यक्ष चक्रधर डोंगरे व सरपंच गंगाधर किनकर, उपसरपंच रंजना चौधरी यांचाही सत्कार घेण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार दादाराव केचे, सरपंच गंगाधर किनकर, उपसरपंच रंजना राजू चौधरी,तालुका भाजप अध्यक्ष चक्रधर डोंगरे, किशोर भांगे ,रामदास राकस किशोर नासरे यांची उपस्थित होती.



यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारात काटोल पंचायत समिती राज्यात दुसरी

दैं.जनप्रभात
नागपूर/ दिलीप येवले

प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यातील उत्कृष्ट योगदानासाठी काटोल पंचायत समितीला राज्य शासनाच्या वर्ष २०२२–२३च्या यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत विभागातून पहिल्या क्रमांकाचा तर राज्यातून दुसऱ्या कम्रांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांतर्गत वर्ष २०२०–२१ साठी विभागस्तरातून भंडारा पंचायत समिती पहिल्या तर राज्यात तिसऱ्या स्थानावर राहिली आहे. या उभय पंचायत समित्यांसह अन्य पुरस्कार विजेत्यांना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते येत्या ५ फेब्रुवारी रोजी गौरविण्यात येणार आहे. यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत नागपूर विभागातील एकूण ६३ पंचायत समित्यांसाठी वर्ष २०२०–२१ आणि वर्ष २०२२–२३ च्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण श्रीमती बिदरी यांच्या हस्ते ५ फेब्रुवारी २०२४ रोजी वंसतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. वर्ष २०२२–२३च्या राज्यस्तरीय पुरस्कारात नागपूर जिल्ह्यातील काटोल पंचाय समितीला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला असून १७ लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. वर्ष २०२२–२३च्या विभाग स्तरावरील पुरस्कारात काटोल पंचायत समितीला पहिल्या क्रमांकाचा तर कामठी पंचायत समितीला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांचे स्वरुप अनुक्रमे ११ लाख आणि ८ लाख रुपये असे आहे. तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार चंद्रपूर पंचायत समिती आणि गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा पंचायत समितीला संयुक्तपणे जाहीर झाला असून या पंचायत समित्यांना पुरस्कार स्वरूपात प्रत्येकी ३ लाख रुपये प्रदान करण्यात येणार आहेत. वर्ष २०२०–२१च्या पुरस्कारात भंडारा पंचायत समिती विभागातून प्रथम आली असून राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. पुरस्कार स्वरूपात क्रमशः ११ लाख आणि १५ लाख रुपये या पंचायत समितीला प्रदान करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पोर्भुणा पंचायत समिती विभागातून दुसऱ्या तर नागपूर जिल्ह्यातील कामठी पंचायत समिती तिसऱ्या क्रमांकावर राहिली आहे. या पंचायत समित्यांना पारितोषिक स्वरुपात अनुक्रमे ८ लाख व ६ लाख रूपये प्रदान करण्यात येणार आहेत. राज्याच्या ग्राम विकास विभागामार्फत वर्ष २००५–०६ पासून स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने विभागस्तर व राज्यस्तरावर राज्यातील पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकासकार्यात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या जिल्हापरिषदा, पचंयात समित्या आणि गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्काराने गौरविण्यात येते.

आजच्या संशोधकांना चिंतन व मनन करून संशोधनाचे कार्य पुढे नेण्याची गरज - डॉ.बबनराव तायवाडे

दैं,जनप्रभात
कोराडी, दिलीप येवले-

श्री सच्चिदानंद शिक्षण संस्था डरा संचालित तायवाडे महाविद्यालय महादुला – कोराडी आणि रिसर्च अकादमी ऑफ सोशल सायन्स मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ''भारतीय इतिहास मिथक आणि वास्तव'' या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद् घाटक व प्रमुख अतिथी प्रोफेसर दानिष मोईन इतिहास विभाग प्रमुख,हैदराबाद युनिव्हर्सिटी यांच्या हस्ते संपन्न झाले. बीजभाषक म्हणून प्रोफेसर दीपक कुमार, जे.एन.यू.दिल्ली तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाले. या परिषदेला व्यासपीठावर तायवाडे महाविद्यालय, महादुला–कोराडी च्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, तायवाडे महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख व परिषदेचे सचिव डॉ. शरद डवरे तसेच पुणे विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. डॉ. जगदीश सोनवणे, डॉ सलीम खान (अधक्ष ,रिसर्च अॅकडमी ऑफ सोशल सायन्सेस ,मुंबई),डॉ. हसीब अहमद कोर्डिनेटर ,रास, मुंबई, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या परिषदेचे उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ.अय्युब खान यांनी केले तर उपस्थित अतीथिंचे आभार डॉ. इस्माईल शेख (रास ,मुंबई) यांनी मानले.अध्यक्षीय भाषण करताना डॉ. बबनराव तायवाडे यांनी इतिहासाचा अभ्यास करताना चिंतन व मनन करून संशोधनाचे कार्य पुढे नेण्याची गरज आहे असे मत मांडले. तर प्रमुख अतिथी डॉ. दानिश मोइन यांनी इतिहासाचा अभ्यास करताना स्वतः ला



प्रश्न विचारून त्यानुसार आपले संशोधन करायला पाहिजे. अशा अभ्यासातून आपल्याला वास्तविक निष्कर्ष काढता येते. असे मत मांडले.या परिषदेच्या द्वितीय सत्रामध्ये संशोधन पेपरचे वाचन करण्यात आले. त्यात प्रामुख्याने डॉ. जगदीश सोनवणे ,पुणे विद्यापीठ, डॉ. जाधव ,नांदेड ,श्री शेख अर्षद, दिल्ली मोहम्मद तारीख रसूल , ए.एस.आय. नागपूर, यांनी इतिहास विषय संबंधित पेपरचे सादरीकरण केले. या तांत्रिक सत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. सुनील घुगल यांनी केले.उद्या दिनांक ४ फेब्रुवारी ला प्रोफेसर राम पुण्यानी मुंबई यांचे मार्गदर्शन लाभणार आहे तरी जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आव्हाहन तायवाडे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांनी केले. या चर्चासत्राला १५० प्राध्यापक व शोधार्थी आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थी परिषदेच्या वतीने चे वलांडी येथे झालेल्या अत्याचाराचा विरोधात उदगीर मध्ये निषेध मार्च

दैं,जनप्रभात---
उपसंपादक
राठोड रमेश पंडित

लातूर/वलांडीः- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उदगीर शाखेच्या वतीने वलांडी ता. देवणी येथे ६ वर्षाच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथून निषेध मार्च काढून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निषेध व्यक्त करण्यात आले. देवणी तालुक्यामध्ये असलेल्या वलांडी गावामध्ये सहा वर्षाच्या मुलीवर एका नराधमाने सलग पाच दिवस लैंगिक अत्याचार केले. जिहादी वृत्तीची मानसिकता असणाऱ्या या नराधमाने अवघ्या सहा वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्यानंतर अभाविप उदगीर शाखेच्या वतीने या वृत्तीचा निषेध छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर येथे करण्यात आला व या नराधमाला लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी,



अशी मागणी करण्यात आली. जिहादी वृत्ती असणाऱ्या लोकांकडून समाजातील महिला सुरक्षित नाहीत, अशा वृत्तीला आळा घालण्याचे काम सरकारने करावे, हिंदुत्ववादी म्हणून घेणाऱ्या सरकारला रामराज्य व स्वराज्यातल्या महिला कशा सुरक्षित राहत होत्या याचा विसर पडलेला दिसतोय आणि या सरकारचा धाक राहिलेला दिसत नाही. त्यामुळे जिहादी वृत्तीचे नराधम अशा घटना करताना दिसत आहेत. सरकारने या जिहादी वृत्तीच्या विरोधात कठोर कारवाई करावी. असे मत अभाविप लातूर विभाग संयोजक विशाल स्वामी यांनी व्यक्त केले.यावेळी भाजपा शहर अध्यक्ष मनोज पुदाले शहरमंत्री आदिनाथ मिरकले, सहमंत्री सुमित लाल, आदित्य पाटील, नितीश शिरसे, अरविंद गुंडिले, पृथ्वीराज बिरादार, दिनेश भोसले, गणेश बिरादार, प्रभात सूर्यवंशी, संध्या हत्ते, धनश्री लाळे, वैभवी लाळे, पल्लवी पाटील, वैशाली राठोड, प्रीती बिरादार, गायत्री कसबे, राजनंदिनी कांबळे, आनंद साबणे, अभिजीत पाटील सह विद्यार्थी, विद्यार्थीनी व उदगीर शहारातील नागरिक उपस्थित होते.

अखंड भारताचे स्वप्न पाहणाऱ्या सुपुत्राचा गौरव'

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचे अभिनंदन

दैं,जनप्रभात---
मुंबई /प्रतिनिधी

अखंड भारताचे स्वप्न पाहणाऱ्या भारत सुपुत्राचा देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव होणे हे आनंददायी आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ नेते, देशाचे माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांचे भारतरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.''प्रखर राष्ट्रभक्त अशा ज्येष्ठ नेते अडवाणी जी यांनी आपले अखंड आयुष्य समाजकारण आणि राजकारण यासाठी समर्पित केले आहे.

अयोध्येत प्रभु श्रीरामचंद्राचे मंदिर व्हावे हे त्यांचे स्वप्न देखील साकार झाले आहे. या मंदिरासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, रथयात्रेचे नेतृत्व या गोष्टी त्यांच्या प्रभावी नेतृत्वशैलीचे उदाहरण आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाची दृष्टी असणारे आणि सर्वसमावेशक असे त्यांचे नेतृत्व आमच्यासाठी प्रेरणादायी आणि आदरणीय आहे. उत्तम संसदपटू आणि परखड विचारांचे नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर होणे अत्यंत आनंददायी बाब आहे. त्यांना उत्तम आयुरारोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, असे अभिष्टचिंतन करून मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ नेते श्री. अडवाणी यांचे भारतरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

****

शेतकऱ्यांसाठी विदेश अभ्यास दौरा

पाच फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन
शेतकऱ्यांसाठी अभ्यासात्मक विदेश दौरा नियोजन

दैं,जनप्रभात
काटोल/प्रशांत पवार

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी विदेश अभ्यास दौरा जाहीर करण्यात आला असून याबाबत पाच फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विभागामार्फत विविध देशांनी विकसित केलेली शेती विषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी केलेला अवलंब त्याडरे त्यांचे उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या – त्या देशातील शास्त्रज्ञ, शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा, क्षेत्रीय भेटी घेण्यात येणार आहेत. तसेच तेथील संस्थांना भेटीडरे शेतकऱ्यांच्या ज्ञान व क्षमता उंचविण्यासाठी राज्य पुरस्कृत योजना २०२३–२४ अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांचे देशातील अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत आहेत. तरी कागदपत्रांची पुर्तता होत असलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय व कृषी विभागाकडे संपर्क करुन आवश्यक कागदपत्रासह ०५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे. अशी माहिती काटोल तालुका कृषी अधिकारी विक्रम भवारी यांनी दिली आहे.महापालिकेत उपायुक्तपदी अजितपालसिंघ संधू विदेश अभ्यास दौऱ्यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यातून प्रत्येकी तीन यानुसार १०२ व राज्यस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार १८ असे एकूण १२० शेतकरी व सहा अधिकारी यांची निवड केली जाणार आहे. क्षेत्रीय स्तरावरील निवड प्रक्रिया पुर्ण करुन ता. पाच फेब्रुवारीपर्यंत शेतकरी याद्या कृषी आयुक्तालयाकडे सादर करण्याचे निर्देश असल्याचे कृषी विभागामार्फत कळविण्यात आले आहे

हौशी छायाचित्रकारांसाठी क्लिक नांदेड छायाचित्र स्पर्धा

महासंस्कृती महोत्सवानिमित्त आयोजन

दैं,जनप्रभात

नांदेड (जिमाका) : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा च्या अनुषंगाने राज्यातील विविध प्रांतातील संस्कृतीचे आदान–प्रदान व्हावे या उद्देशाने दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ''महासंस्कृती महोत्सवाचे'' आयोजन करण्यात आले आहे. याचे औचित्य साधून महोत्सवाचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्ह्यातील विविध जैवविविधता, पर्यटनस्थळ, पशु–पक्षी, वनसंपदा, धबधबे, नदी, शिल्प, ऐतिहासिक स्थळे आदी विषयांना प्रतिबिंबीत करणारे क्लिक नांदेड छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. छायाचित्र स्पर्धेत पुढील विषय देण्यात येत आहेत. यात निसर्ग, पशु–पक्षी, शिक्षण, कला, स्थापत्य, जीवनशैली, खेळ, पर्यटन, खाद्यसंस्कृती, जैवविविधता, परंपरा, संस्कृतीवरील छायाचित्रांचा समावेश असावा. हे छायाचित्र जानेवारी २०२३ ते दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी मध्यरात्री पर्यंत काढलेले छायाचित्र असावेत. यासाठी पुढील नियमावली, अटी ठेवण्यात आल्या आहेत. छायाचित्र नांदेड जिल्ह्यातीलच असावीत. प्रती छायाचित्र (खचअन्वय) जास्तीत जास्त १० एमबी व कमीत कमी ०३ एमबी ची छायाचित्रे ग्राह्य धरल्या जातील.

ज्ञानेश्वरी ग्रंथ अन् यथोचित सॅल्युट..

वडवणी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमन सिरसट ...

दैं,जनप्रभात
बीड जनप्रभात गितांजली

लव्हाळे :– सविस्तर वृत्त असे की वडवणी पोलिस निरीक्षक अमर सिरसट यांनी आपल्या स्वभावानं तालुक्यातील तमाम नागरिकांना अक्षरशः भुरळ घातली आहे. तालुक्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच सर्व समाजाच्या कार्यक्रमात आवर्जून सहभागी होऊन पोलिस खात्यातील एका अधिकाऱ्याचा स्वभाव दाखवून दिला आहे. श्री.अमन सिरसट यांनी काही दिवसांपूर्वी धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहुन आपल्यातील कलागुण सर्वांसमोर मांडले आहेत. सोन्नाखोटा येथील महादेव महाराज खोटे यांच्या धार्मिक कार्यक्रमातही त्यांनी ''कानडा राजा पंढरीचा'' हे भक्ती गीत सादर करून लाखों



चाहत्यांकडून वाहवा मिळवली आहे. अशा अधिकाऱ्याचा निश्चितच गौरव केला पाहिजे या उदात्त हेतूने श्री. महादेव महाराज खोटे यांनी आपले मित्र चंद्रकांत खोटे पाटील,दत्तात्रय केदार पाटील,श्रीमंत साळुंखे पाटील,श्रीमंत खोटे पाटील,रामेश्वर कदम पाटील ,रमेश रावजी केदार पाटील,आत्माराम जमाले पाटील यांना सोबत घेऊन पोलीस स्टेशन प्रांगणात यथोचित सत्कार करुन ज्ञानेश्वरी ग्रंथ (पुस्तक) देऊन गौरव केला.यावेळी पोलिस उपनिरीक्षक श्री.राठोड,संपादक अनिल वाघमारे,पोलिस कर्मचारी श्री.माळी,पोलिस कर्मचारी श्री.गुंजाळ सह आदी उपस्थित होते.

३ फेब्रुवारी २००५ रोजी घटनेच्या ठिकाणी रेल्वे अपघात मरण पावलेल्या

निरपराध ५७ जणांना श्रद्धांजली

दैं,जनप्रभात
नंदू कोल्हे –

कामठी :–३ फेब्रुवारी २००५ रोजी रामटेक–नागपूर पॅसेंजर ट्रेनमध्ये लग्नाची मिरवणूक घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरचा अपघात झाला होता, त्यात ५७ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. हा अपघात नागपूर जिल्ह्याच्या इतिहासातील सर्वात मोठा होता. या ठिकाणी एकही फाटक नाही. रेल्वे क्रॉसिंगवर.त्यामुळे ही घटना घडली.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अपघातस्थळी मृत व्यक्तींचे स्मरण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी दयाराम भोयर, संजय सत्येकर, श्रीराम नांदूरकर, कैलास खंडार, नितेश गभणे, अंकुश



वाडीभस्मे, संजय इंगोले, देवाशिष सत्येकर, राजू आदी उपस्थित होते. अपघातस्थळी सरोदे, नरेश गुप्ता, नीलेश जुमले, विनायक उईके, कैलास काकडे, तुकाराम वानखेडे, पार्वती यादव, काजल यादव, कीर्ती यादव, रमाकांती गुप्ता उपस्थित होते.

राज्यातील विविध प्रकल्पांसाठी १६०० कोटी रुपयांचा निधी देणार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

दैं,जनप्रभात मुंबई, दि. ३ :

राज्यातील पर्यटन वृध्दी होऊन रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी रोप वे करीता निश्चित केलेल्या ४० ठिकाणांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश देतानाच राज्यातील ८१ रस्ता प्रकल्पांच्या कामासाठी १६०० कोटी रुपये मंजूर करण्यात येतील, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे सांगितले. भारतीय राजमार्ग अभियंता अकादमी आणि राज्य शासनाचा नगरविकास विभाग यांच्या दरम्यान राज्यातील सहा शहरातील वाहतूक कोंडी समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी आणि राष्ट्रीय राजमार्ग वाहतूक व्यवस्थापन कंपनी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात रोप वे उभारणी बाबत आज दुपारी सह्याद्री अतिथिगृह येथे सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यावेळी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले की, राष्ट्रीय राजमार्ग वाहतूक व्यवस्थापना बरोबरच्या सामंजस्य करारामुळे रोप वे विकसित केले जातील. राज्यातून ४० प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सहा ठिकाणच्या प्रकल्पांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. या प्रकल्पांसाठी आवश्यक असणारा निधी केंद्र सरकार देईल. राज्य शासनाने प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी जमीन उपलब्ध करुन द्यावी.श्री. गडकरी यांनी सांगितले की, रोप वे ची निर्मिती करतानाच त्या भागात पर्यटकांसाठी पार्किंग सुविधा, निवास, भोजनाच्या व्यवस्था विकसित कराव्यात. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. रोप वे तयार करतानाच त्या भागातील उत्पादने विक्रीसाठी बाजारपेठ विकसित करावी. तसेच वाहनांच्या चार्जिंगसाठीची सुविधा उपलब्ध करून देतानाच सौर ऊर्जा वापरासाठी प्राधान्य द्यावे. सर्वत्र नागरीकरण वाढत आहे. अशा परिस्थितीत वाहतुकीच्या नियोजनासाठी शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. अभियंता अकादमीच्या माध्यमातून अभ्यास होऊन वाहतूक सुलभ होऊन अपघात कमी होण्यास मदत होईल, असे श्री. गडकरी यांनी सांगितले. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या शहरातील वाहतूक कोंडीचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत.मंत्री श्री. चव्हाण म्हणाले की, राष्ट्रीय राजमार्ग वाहतूक व्यवस्थापनाबरोबरच्या करारामुळे पर्यटनाला चालना मिळेल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्य शासनातर्फे आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच नगर विकास विभागाच्या करारामुळे वाहतुकीचे नियोजन करणे सोयीस्कर होईल. वाहतुकीच्या अभ्यासासाठी निवडलेल्या शहरांमध्ये स्मार्ट सिटी साठी निवडलेल्या शहरांचा समावेश करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.श्रीमती म्हैसकर म्हणाल्या की, रोप वे सामंजस्य करारामुळे राज्यातील निसर्ग रम्य, ऐतिहासिक, धार्मिक स्थळे जोडली जातील. त्यामुळे पर्यटकांना सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे राज्यातील पर्यटनाला चालना मिळेल. श्री. गुप्ता म्हणाले की, अभियंता अकदामी बरोबर च्या सामंजस्य करारामुळे वाहतुकीचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास होईल. पहिल्या टप्प्यात यामध्ये राज्यातील सहा शहरांचा समावेश आहे, असे सांगितले. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता संतोष शेलार, मनोजकुमार फेगडे अतिरिक्त परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करणे शाळेची जुनी परंपरा

सचिव, श्री उमेश देशपांडे श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ

दैं,जनप्रभात
सुनील मांडवे/प्रतिनिधी


आष्टी(शहीद)ता.श्री समर्थ शिक्षक प्रसारक मंडळ आष्टी डरा संचालित लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, ची स्थापना सन १९५६ झाली असून या शाळेत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करणे ही जुनी परंपरा आहे. ती आजच्याही काळात टिकून आहे आणि पुढेही चालू राहील असे प्रतिपादन संस्थेचे सचिव उमेश जी देशपांडे यांनी व्यक्त केले. २६ जानेवारीला शालांत परीक्षा मार्च २०२३ ला विद्यालय सर्वप्रथम तसेच वर्धा जिल्ह्यातून द्वितीय आलेला श्रीकांत मोहन निंभोरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शनिवार २७जानेवारी ला पारितोषिक वितरण सोहळा यात शालांत व उच्च शालांत परीक्षा मार्च २०२३ मध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे रोख रक्कम आणि शिल्ड देऊन गौरवण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर संस्था अध्यक्ष श्री सुभाषजी गुप्ता माजी विद्यार्थी स्वराज दीपक आजने, सहाय्यक अभियंता आलापल्ली, भाऊसाहेब वैकुंठराव शेटे मॅनेजिंग डायरेक्टर शास्वत गुप नागपूर, नुकताच महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी परीक्षेतून सर्व प्रथम आलेला माजी विद्यार्थी राकेश रवींद्र झामडे,संस्था सचिव उमेशजी देशपांडे, मुख्याध्यापक, श्री विजय दाभाडे, उपमुख्याध्यापक श्री नारायण वरकड, पर्यवेक्षक सौ संगीता खोंडे उपस्थित होत्या. या अगोदर कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक विद्यालय यांचे शालेय स्वयंशासन कार्यक्रम घेण्यात आला स्काऊट, गाईड एन सी सी,च्या वतीने आनंद मेळावा, हळदीकुंकू चा कार्यक्रम घेण्यात आला. याकरिता प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य श्री राजेंद्रजी डोईजोड उपस्थित होते. आभार प्रदर्शन श्री जयदेव दि. देशपांडे यांनी केले

समस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शालेय विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

एका पक्ष प्रवेशावरून दोन सत्ताधारी आमदारांत जुंपली ! समाज माध्यमांवर हल्ले - प्रतिहल्ले



दैं.जनप्रभात प्रतिनिधी /हिंगोली

हिंगोली : भा.ज.पा चे माजी नगरसेवक गणेश बांगर यांच्या शिवसेना शिंदे गट प्रवेशावरून भाजप आमदार तान्हाजी मुटकळे व शिंदे गट आमदार संतोष बांगर यांच्यात चांगलीच जुंपली असून, दोघांचे समर्थक समाज माध्यमांवर हल्ले – प्रतिहल्ले करीत आहेत. भाजपा पक्षाचे युवा कार्यकर्ते व दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या पैलवान गणेश बांगर यांनी मागील आठवड्यात भाजपा पक्षाला सोडचिठ्ठी दिली. काही दिवस शांत राहून गणेश बांगर यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेतला. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख व कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांनी गणेश बांगर यांना पक्षात देऊन तसे एका दगडात अनेक पक्षी मारले. हिंगोली शहरातील वंजारवाडा भागात दोन प्रभागात चांगलेच वर्चस्व असलेल्या गणेश बांगर यांच्यामुळे शिवसेना शिंदे गटाला हिंगोलीत मोठी ताकद मिळाली. या शिवाय गणेश बांगर यांच्या कार्यकर्त्यांच्या मुळीचा आमदार संतोष बांगर यांना भविष्यात नक्कीच फायदा होईल. दुसरीकडे गणेश बांगर यांच्या राजीनाम्यामुळे भाजपा पक्षात एक पोकळी निर्माण झाली. वंजारवाडा भागातून यापूर्वी भाजपा पक्षातर्फे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर वगळता इतर कोणीही निवडून येऊ शकले नाही. या भागावर पूर्वीपासून शिवसेनेचे वर्चस्व राहिले आहे. या वर्चस्वात दोन वेळा निवडून आलेले गणेश बांगर आता शिंदे गट शिवसैनिक झाले आहेत. गणेश बांगर यांना आमदार सतोष बांगर यांनी शिवसेनेत घेतल्याने नाराज झालेल्या भाजप आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. यामुळे आमदार संतोष बांगर यांच्या नाराज झालेल्या कार्यकर्त्यानी समाज माध्यमांवर आ तान्हाजी मुटकुळे यांच्या विरोधात आघाडीच उघडली. अशातच एका प्रकरणात दोन दिवसापूर्वी एका युवकावर गुन्हा दाखल झाला आहे. दुसरीकडे आमदार तान्हाजी मुटकुळे यांचे समर्थकही समाज माध्यमावर सक्रीय झाले आहेत या पूर्वीही या दोन नेत्यामध्ये बेबनाव झाला होता. सध्या दोघे सत्ताधारी महायुतीत असल्यामुळे एकत्र होते. अशातच हे नवीन वाद सुरु झाल्यामुळे हिंगोली जिल्हात राजकीय वातावरण प्रचंड प्रमाणात ढवळून निघत आहे.

द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या शिरूर तालुका सचिवपदी अक्षय वेताळ;

तालुका कार्याध्यक्षपदी सुजित मैड तर तालुका संपर्कप्रमुखपदी विजय कांबळे

दैं.जनप्रभात
पुणे– प्रतिनिधी / रिजवान बागवान

पत्रकार बांधवांच्या न्याय हक्कासाठी व अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढा उभारून पत्रकारांना न्याय देणारी तसेच आवाज उठविणारी संघटना म्हणजे द युवा ग्रामीण पत्रकार संघ,या संघटनेच्या शिरूर तालुका सचिवपदी न्हावरे अक्षय वेताळ यांची व कार्याध्यक्षपदी न्हावरे येथील सुजित मैड तर संपर्कप्रमुखपदी नागरगाव येथील विजय कांबळे यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली आहे.

शिरूर शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालय येथे पार पडलेल्या द युवा ग्रामीण पत्रकार संघ आयोजित मराठी दिनदर्शिका २०२४ चे प्रकाशन सोहळ्यात तालुका सचिव अक्षय वेताळ तालुका कार्याध्यक्ष सुजित मैड संपर्कप्रमुख विजय कांबळे यांना संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख,राज्य कार्याध्यक्ष शामभाऊ कांबळे,इलेक्ट्रॉनिक मिडिया प्रमुख रोहित वाळके,पुणे जिल्हाध्यक्ष रिजवान बागवान आदि.यांच्या शुभहस्ते गौरव करून नियुक्तीपत्र देण्यात आले.



तालुका सचिवपदी अक्षय वेताळ,तालुका कार्याध्यक्षपदी सुजित मैड व तालुका संपर्क प्रमुखपदी विजय कांबळे यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष मा.तात्यासाहेब सोनवणे,द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राज्य कार्याध्यक्ष मा.शामभाऊ कांबळे,निमोणे गावचे सरपंच मा.संजय (आबा) काळे,मा. आदर्श सरपंच जिजाताई दुर्गे,देवदैठण गावचे मा.सरपंच मंगलताई कौठाळे,सामाजिक कार्यकर्ते हाजी सादिकभाई बागवान,शालेय व्यवस्थापन समितीचे निर्वी अध्यक्ष मा.प्रदिपभाऊ साळुंकेशरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे शिरूर तालुकाध्यक्ष मा.नवनाथ गव्हाणे,श्रीपाद उद्योग समुहाचे अध्यक्ष मा.कमलेश बुराडे,द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे नगर तालुकाध्यक्ष मा.हेमंत साठे,सदस्य बिभिषण झेंडे आदिंनी कौतुक करून अभिनंदन केले आहे आहे. द युवा ग्रामीण पत्रकार संघाची कार्यकारणी पुढीलप्रमाणे– तालुकाध्यक्ष शकील मनियार,तालुका उपाध्यक्ष विवेकानंद फंड,विश्वनाथ घोडके,तालुका सचिव अक्षय वेताळ,तालुका कार्याध्यक्ष सुजित मैड,तालुका संपर्कप्रमुख विजय कांबळे,तालुका सल्लागार संतोष काळे,तालुका कोषाध्यक्ष मच्छिंद्र काळे,तालुका खजिनदार संजय मोरे,तालुका संघटक सुदर्शन दरेकर,तालुका सरचिटणीस सुनिल काटे,कायदेविषयी सल्लागार एडवोकेट इन्नुस मणियार आदि.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडून भजन मंडळाला साहित्याचे वाटप.



दैं.जनप्रभात
नागपूर / नंदू कोल्हे

आज भारतीय जनता पार्टी (ओबीसी मोर्चा) उत्तर नागपुर अध्यक्ष सचिन खोब्रागडे यांचा निवेदनावर केन्द्रीय मंत्री नागपुर चे लाडके खासदार नितिन गडकरी साहेब यांनी माउली महिला भजन मंडळ कलमना वस्ती,विठ्ठल रुक्मिणी महिला भजन मंडळ ओम साई नगर, श्रद्धा महिला भजन मंडळ बेले नगर,गुरुदेव महिला भजन मंडळ जयंत नगर या भजन मंडळा ला गडकरी साहेब यांचा आफिस मधून भजन मंडळ साहित्य प्रदान करण्यात आले. लोकांची कामे गडकरी साहेब यांचा जनता दरबार माध्यमातुन भाजपा नेता सचिन खोब्रागडे यांनी उत्तर नागपुर प्रभाग क्र ४ कलमना येथील लोकाना वयश्री योजना असो या आवास योजना तसेच कोणाला वैद्यकीय सहायता करिता खासदार निधि अंतर्गत केंद्रीय मंत्री नामदार नितीन गडकरी यांचा आफिस मधून भरपूर नागरिकांची सेवा करण्यात येत आहे.या भजन मंडळ साहित्य प्रदान दरम्यान ओबीसी मोर्चा उत्तर नागपुर अध्यक्ष सचिन खोब्रागडे, नगरसेविका निरंजना महेश पाटिल, प्रभाग अध्यक्ष सविता संदीप चौधरी, युनीशा सचिन खोब्रागडे, संदीप चौधरी नीरज शर्मा, निखिल करंडे, मोहन खापेकर, राजेश केसारवानी, राकेश चौधरी , मुक्ताताई इंगोल, प्रेमती नागवंशी, मायाताई गिरी, सरोज शर्मा नीता , पूरी मुल्तानी, सविता शाहू, सायत्राताई नाटकर, बेबीबाई कडू, सुभांगीताई सवई, चंद्रकलाबाई भोंगाडे, वर्षा कडु, सुमन सनोडीया, पूजा चौधरी या महिला उपस्थित होत्या यानि नितीन गडकरी साहेब व सचिन खोब्रागडे यांचे भजन मंडल साहित्य दिल्या बद्दल मनापासून आभार मानले.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्रासदायक रस्ते बनले डोकेदुखी

आमदार दादाराव केचे यांना विविध समस्याविषयी निवेदन

दैं.जनप्रभात
आर्वी :–प्रतिनिधी

आर्वी तालुक्यातील निंबोली शेंडे येथील नागरिक विविध समस्येला समोर जात आहे. या सर्व समस्येचे निराकरण व्हावे याकरिता निंबोली वासीयांकडून आमदार दादाराव केचे यांना निवेदनाच्या माध्यमातून साकडे घालण्यात आले आहे.सविस्तर बातमी अशी आहे की, निंबोली शेंडे येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्याकरिता व्यवस्थित रस्ता नसल्याने रस्त्याची समस्या ही शेतकऱ्यांना डोकेदुखी ठरत आहे. तसेच निंबोली शेंडे या गावाचे पुनर्वसन अरबी नजीक मौजा दलपतपुर येथे झाले असून पुनर्वसन मध्ये अनेक समस्यांना निंबोली शेंडे येथील नागरिकांना समोर जावे लागत आहे. त्यातील पिण्याचे पाण्याची प्रमुख समस्या त्याने निंबोली शेंडे येथील नागरिक त्रस्त झालेले आहे. या सर्व समस्या विचारात घेऊन त्या कायमस्वरूपी सोडविल्या जाव्यात याकरिता निंबोली शेंडे येथील नागरिकांनी आमदार दादाराव केचे यांना निवेदनातून साकडे घातले आहे. तर दादाराव केचे यांनी दिनांक ०५/०२/२४ ला उपविभागीय अधिकारी यांच्याशी बैठक लावून सर्व समस्या निकाली काढण्यात येईल असे आश्वासन दिले. याप्रसंगी सौ.प्रणीता रा भगत सरपंच निंबोली शेन्डे,धिरेंद्र वि.शेन्डे (डायरेक्टर माहातमा साखरकाखाना) हर्षद शेन्डे तालुका अध्यक्ष आर्वी भाजपा,सुभाषराव शेंडे ,चंदु काकासाहेब शेन्डे,दिवाकरराव राजोरकर, दिपकराव शेन्डे,प्रविन शेन्डे ,सुधीर शेंडे ,बंडू शेंडे ,त्र्यंबक शेन्डे ,मनोज शेंडे ,नितिन शेंडे ,प्रशांत शेन्डे, राजु भगत ,अमित शेंडे ,राहुल भगत, मंगेश कुभरे,प्रमोद शेंडे ,अविनाश ढोमणे,सुनिल ढोरे उपस्थित होते.

****



राष्ट्रीय आरोग्य नियंत्रणामध्ये विविध चिकित्सा पद्धतींची मोलाची भूमिका – ना. संजय बनसोडे

दैं.जनप्रभात –
उपसंपादक /
राठोड रमेश पंडित

लातूर/उदगीर:– राष्ट्रीय आरोग्य नियंत्रणामध्ये विविध चिकित्सा पद्धतीचा सिंहाचा वाटा असून भारतीय चिकित्सा पद्धतीने मोलाची भूमिका बजावली असे विचार नामदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर डरा आयोजित नॅशनल कॉन्फरन्स ऑन कार्डिओलॉजी,न्यूरो–सायकोलॉजी अँड नेफ्रो–यूरोलॉजी या राष्ट्रीय परिसंवाद संभाषा–२०२४ प्रसंगी उद्घाटन प्रसंगी बोलताना क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांनी उपरोक्त उद्गार काढले.उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.बाबासाहेब पाटील हे होते तर प्रमुख अतिथी डॉ.मिलिंद निकुंभ,डॉ. विलास हरपाळे,डॉ.दिलीप वांगे,सुशांत शिंदे,रामेश्वर गोरे,बळीराम भिंगोले,अंकुशराव कानवटे,साहेबराव जाधव,डॉ.मुकुंद बंडले,भरत चामले,डॉ.दत्तात्रय पवार,सुदर्शन मुंडे,डॉ.माणिक कुलकर्णी,डॉ. रत्नेश्वर धानुरे,श्री.धनाजी मुळे,आदि उपस्थित होते.धन्वंतरी पूजन–स्तवन व दीपप्रज्वलनाने परिसंवादाची सुरुवात झाली. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा पाहुणे व तज्ज्ञ वक्त्याचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय पाटील यांनी करून दिला.सदरील राष्ट्रीय परिसंवादासाठी संपूर्ण देशातून ऍलोपॅथी,आयुर्वेद,होमिओपॅथी,नर्सिंग,फिजियोथेरेपी व योग क्षेत्रातील एकूण ९३४ डॉक्टर्स, शिक्षकवृंद,संशोधक,विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदविला.याप्रसंगी विविध चिकित्सा पद्धतीच्या एकूण १८ अभ्यासू व तज्ज्ञ डॉक्टरांचे व्याख्यान संपन्न झाले.तर पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. शिक्षण घेणारे डॉक्टर्स, शिक्षक वृंद व संशोधक तथा विद्यार्थी–विद्यार्थिनी यांचे ६७ संशोधन पत्र सादर करण्यात आले तथा एकूण ११५ जणांच्या पोस्टर व आरोग्य विषयक माहिती–चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी बोलताना प्रति कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ म्हणाले, विविध चिकित्सा पद्धतींचा समन्वय ही काळाची गरज आहे.महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक डरा संशोधनकार्यासाठी स्कॉलरशिपच्या स्वरूपात प्राध्यापक,डॉक्टर्स,संशोधक,विद्यार्थी–विद्यार्थिनी यांना आर्थिक सहाय्य केले जात असल्याचे



सांगून विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी औषधी किंवा अन्य पेटंट मिळवण्यासाठी सुद्धा प्रयत्नरत राहिले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.उद्घाटन पर भाषणात पुढे बोलताना ना.संजय बनसोडे म्हणाले की प्रत्येक क्षेत्रात संशोधनात्मक कार्य ही निरंतर प्रक्रिया आहे.वैद्यकीय क्षेत्रमध्ये संशोधनामुळे नवीन उपचार–उपक्रमाचीमाहितीमिळते.बदलत्या जीवनशैलीमुळे आर्थिक समस्या व मानसिक ताणतणाव याला अनेक जण सामोरे जात आहेत तथा जंक फूडचे सेवन,व्यसनाधीनता व व्यायामाचा अभाव यामुळे रोग निर्माण होत आहेत आणि प्रसंगी रोग अंगावर काढल्यामुळे तो असाध्य अवस्थेकडे जात आहे.अशावेळी डॉक्टरांनी विविध प्रबोधन उपक्रमाच्या माध्यमातून विविध रोग विषयक माहिती देणे गरजेचे आहे असे सांगितले.अध्यक्षीय समारोपात आ.बाबासाहेब पाटील म्हणाले की विविध चिकित्सापद्धतीचा एकाच ठिकाणी एकाच वेळी राष्ट्रीय परिसंवाद ही अभिनव संकल्पना आहे.त्यामुळे त्या–त्या चिकित्सा पद्धतीमधील अद्ययावत माहितीचा लाभ डॉक्टर्स व विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या माध्यमातून रुग्णांना होऊ शकतो. प्रत्येक चिकित्सा पद्धतीच्या वैद्यकीय व्यावसायिकांनी फॅमिली डॉक्टर या भूमिकेतून चिकित्सक व समुपदेशक म्हणून कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे सांगितले.या प्रसंगी डॉ. विलास हरपाळे व डॉ.दिलीप वांगे यांची समयोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन डॉ.प्रशांत बिरादार व डॉ.राखी वरनाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.पुष्पा गवळे यांनी केले.सदरील राष्ट्रीय परिसंवादाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक वृंद,वैद्यकीय अधिकारी,आंतरवासियता प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी–विद्यार्थिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

हिंगणघाट जिल्हा तसेच सिंदी(रेल्वे) तालुका घोषित करा– माजी आमदार प्रा.राजु तिमांडे

मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,सहकार मंत्री यांना निवेदनाद्वारे मागणी.

दैं.जनप्रभात
तालुका प्रतिनिधी अमोल झाडे

समुद्रपुर : सिंदी (रेल्वे) तालुका घोषित करण्यात यावा तसेच हिंगणघाट जिल्हा घोषित करण्याबाबद महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक–सचिव तथा माजी आमदार प्रा.राजू तिमांडे यांच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना उपविभागीय अधिकारी मार्फत निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली. यावेळी सोबत गंगाधर कलोडे,सुरज कोपरकर,पवन कस्तुरे,वैभव मानोकर,सागर अबोरे,आशिष देवतळे,मनोज तिमांडे उपस्थित होते. राज्यातील मोठया आणि दुर्गम तालुक्यांचे विभाजन करून नविन तालुके निर्माण करण्याची कार्यवाही तीन महिन्यात पुर्ण होणार असल्याची माहिती महसुल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत दिली. आयुक्तांच्या समितीने पदांची निर्मिती निश्चित केली असुन मोठया तालुक्यांसाठी २४ पदे, मध्यमसाठी २३ आणि लहान तालुक्यासाठी २० पदांची निर्मिती ठरवुन आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. अहवाल आल्यानंतर तीन महिन्यात नविन तालुका निर्मितीबाबद कार्यवाही करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी जाहीर केले.सिंदी (रेल्वे) या गावाला नगर पंचायत असुन १७ नगरसेवक आहे. सिंदी (रेल्वे) ही मोठी बाज़ारपेठ असुन ८० ते ९० गावांचा समावेश आहे. वर्धा जिल्हयातील समुद्रपुर तालुक्यातील कांढळी जिल्हा परिषद सर्कलचा संपुर्ण परिसर सिंदी (रेल्वे) गावाला लागुन आहे. तसेच वर्धा तालुक्यातील हमदापुर जिल्हा परिषद सर्कलचा संपुर्ण परिसर सिंदी (रेल्वे) गावाला लागुन आहे. नागपुर जिल्हयाचा भाग सुध्दा सिंदी (रेल्वे) गावाला लागुन आहे. सिंदी (रेल्वे) येथे नागपुर –वर्धा–हिंगणघाट–मद्रास ते भुसावळ रेल्वे लाईन जात असुन गाडयांचे थांबे आहेत. सिंदी (रेल्वे) प्राथमिक स्वास्थ केंद्र आहे. सिंदी (रेल्वे) येथे शैक्षणिक दृष्टया ५ ज्युनिअर कॉलेज असुन ६ हायस्कुल आहे. सिंदी (रेल्वे) ला लागुन नागपुर ते मुंबई समृध्दी महामार्ग लागला असुन ३० ते ४० कि.मी. अंतरावर नागपुर विमानतळ आहे. तरी सर्व भौगोलिक परिस्थितीचा अंदाज लक्षात घेता सिंदी (रेल्वे) तालुका घोषित करण्यात यावा. वर्धा जिल्हयाचा परिसर हा आर्वी –आष्टी–कारंजा ते हिंगणघाट –समुद्रपुर तालुक्यातील गिरडच्या टोकापर्यंत असुन लोकसंख्या वाढली आहे. हिंगणघाट परिसराला नागपुर – चंद्रपुर, यवतमाळ जिल्हयाच्या सिमा लागल्या असुन हायवेचे रोड जोडल्या गेले आहे. यवतमाळ जिल्हयाचा परिसर वणी तालुका, केळापुर तालुका (पांढरकवडा) ते आर्णि तालुक्यातील तेलंगाना व आंध्रप्रदेश च्या सिमेपर्यंत असुन खुप मोठया प्रमाणात व्यापला असुन जिल्हयाची कामे करतांना नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे चंद्रपुर जिल्हयाचा वरोरा, चिमुर तालुका हिंगणघाट परिसराला १५ ते २० किलोमिटर अंतरावर लागुन आहे. नागपुर जिल्याचा उमरेड तालुक्याचा परिसर ३० कि.मी. अंतरावर जोडला गेला आहे.हिंगणघाट परिसराला यवतमाळ जिल्हयातील केळापुर (पांढरकवडा) तालुका, वणी तालुका,राळेगांव तालुका लागुन आहे. चंद्रपुर जिल्हयातील वरोरा, चिमुर तालुके जवळ आहे. नागपुर जिल्हयातील उमरेड तालुक्याचा परिसर सभोवताल आहे.



नागपुर ते कन्याकुमारी नॅशनल हायवे नं. ७ हा हिंगणघाट तालुक्याच्या परिसरातुन गेलेला असुन मोठया प्रमाणात दळण वळणाची साधने उपलब्ध आहे. नागपुर ते मद्रास रेल्वे लाईन हिंगणघाट परिसरातुन गेली आहे. नागपुर ते चंद्रपुर नॅशनल हायवे आंध्रप्रदेशच्या परिसराला जोडल्या गेला आहे. दि.२०.१२.२०२३ रोजी महाराष्ट्र सरकारने हिंगणघाटला मेडिकल कॉलेज मंजुर केल्याची घोषणा केली आहे. नागपुर येथिल एयरपोर्ट ७० कि.मी.अंतरावर आहे. हिंगणघाट परिसराला लागुन नागपुर,चंद्रपुर,यवतमाळ जिल्हयाचा परिसर जोडुन हिंगणघाट जिल्हा निर्माण होऊ शकतो.लोकसंख्या आणि परिसिमा यांचा भौगोलिक विचार लक्षात घेता हिंगणघाट जिल्हा घोषित करण्यात यावा अशी जन मागणी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक– सचिव तथा माजी आमदार प्रा.राजु तिमांडे यांच्या वतीने करण्यात आली.

निवडक महामुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर एक शस्त्रक्रिया झाली आहे. डोळ्याचा त्रास होत असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोळ्याची तपासणी केली होती. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर लेझर ट्रिटमेंटद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सकाळी नऊ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आपल्या ठाण्याच्या घरी परतले आहेत. शस्त्रक्रियेनंतर काही काळ विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे.

मराठा सर्वेक्षणात आरोग्य सेविकेला मारहाण

मुंबई : २३ जानेवारीपासून मुंबईत मराठा सर्वेक्षणाला सुरुवात झाली असून सर्वेक्षण करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यात वांद्रे येथे मराठा सर्वेक्षणात आरोग्य सेविकेला मारहाण झाल्याचे आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेकडून सांगण्यात आले. दरम्यान, या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले. दरम्यान, मारहाण करणाऱ्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी आरोग्यसेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश देवदास यांनी केली आहे. मराठा सर्वेक्षणासाठी पालिकेच्या विविध विभागांतील ३० हजार कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र या सर्वेक्षणात सार्वजनिक आरोग्य खात्याकडून जबरदस्ती केली जाते. सर्वेक्षणावेळी डॉक्टर्स व महिला आरोग्यसेविका वर नागरिकांकडून हल्ले होत असून, अपमान केला जात आहे. पालिका प्रशासन महिला डॉक्टर्स, महिला आरोग्य सेविकांना संरक्षण देवू शकत नसेल, तर सर्वेक्षण बंद करावे व ज्यांनी मारहाण केली, त्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी केल्याचे ॲड. प्रकाश देवदास म्हणाले.

वृत्तपत्र विक्रेत्याला मिळाली डॉक्टरेट



मुंबई : अंधेरी येथील हॉटेल कोहिनूर कॉन्टिनेन्टलमध्ये २४ जानेवारी रोजी एम्पॉवर सोशल अँड एज्युकेशन ट्रस्ट आयोजित ११ वा भारत निर्माण योगदान अवॉर्ड २०२४ या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात लोअर परळ विभागातील वृत्तपत्र विक्रेते डॉ. नीलेश मानकर यांना सामाजिक क्षेत्रातील केलेल्या कार्याबद्दल 'सोशल वर्कर' ही पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी लोअर परळ वृत्तपत्र विक्रेत्या संघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी अमेरिकन युनिव्हर्सिटीचे संस्थापक आणि चेअरमन मधु किशन यांना आमंत्रित केले होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमासाठी भारताच्या कोनाकोपऱ्यातून विविध मान्यवर उपस्थित होते. मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. घनश्याम कोळंबे यांनी सर्वांचे आभार मानले.

शॉर्ट फिल्मसाठी लेखकाची साडेपाच लाखांची फसवणूक

मुंबई : शॉर्ट फिल्मसाठी एका लेखकांची साडेपाच लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध ओशिवरा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. मनोज खाडे, धनंजय मान, रोहित यादव आदित्य चौधरी अशी या चौघांची नावे असून, पळून गेलेल्या या चौघांच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. तक्रारदार फिल्ममेकिंगचे काम करून ते कथा लेखक म्हणूनही काम करतात. नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांची फेसबुकवरून संतोष गुप्ताशी ओळख झाली होती. तो एका निर्मात्याच्या फेसबुक ग्रुपमध्ये होता, त्यामुळे त्यांनी त्याला ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी ॲप्रुव्हल देण्यासाठी विनंती केली होती. त्याच्याच माध्यमातून त्यांची इतर चारही आरोपींशी ओळख झाली होती. त्यांना एका शॉर्ट फिल्मसाठी फायनान्सची गरज असल्याने रोहितने त्यांची ओळख फॉक्स व्हिजन फिल्मचे मालक धनंजय मान आणि मनोज खाडेशी करून दिली होती. त्यानंतर त्यांच्यात एक बैठक झाली होती. ते निर्माता-दिग्दर्शक असलेल्या एका शॉर्ट फिल्मसाठी त्यांनी त्यांना बारा लाखांचे फायनान्स आणि ॲमेझॉनवर ही फिल्म रिलीज करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामोबदल्यात त्यांना २५ टक्के कमिशन मिळण्याचा एक करार झाला होता. त्यानंतर त्यांनी एक मुलाकात नावाच्या शॉर्ट फिल्मची तयारी सुरू केली होती.

तीन लाख कारागिरांना मुख्य प्रवाहात आणणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : विश्वकर्मा योजनेच्या १०१ कौशल्य केंद्रांचा शुभारंभ

प्रतिनिधी/मुंबई

पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेला ओळख प्राप्त करून देणारी पी. एम. विश्वकर्मा सन्मान योजना नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केली आहे. महाराष्ट्र या सन्मान योजनेतही अग्रेसर राहील, असा विश्वास व्यक्त करत या योजनेंतर्गत २०२८ पर्यंत तीन लाख कारागिरांना विकासाच्या प्रवाहात आणणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिली.

एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे पी. एम. विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील १०१ केंद्रांचा शुभारंभ रिमोटद्वारे करण्यात आला. यावेळी बोलताना शिंदे यांनी पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतून राज्यात नवनवीन स्टार्टअपही सुरू व्हावीत आणि या स्टार्टअपनी जागतिक स्पर्धेत उतरावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतील १०१ तुकड्यांना आपण प्रशिक्षण देत आहोत. आगामी काळात अन्य जिल्ह्यांतही या प्रशिक्षणाचा विस्तार करण्यात येईल आणि त्याला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे शिंदे यांनी सांगितले.

राज्यात कौशल्य विकासासाठी मुंबईसह नागपूर, पुणे येथे कौशल्य विकास विद्यापीठ सुरू केली आहेत. राज्यात नमो रोजगार



अभियानांतर्गत नमो महारोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. नागपूरमध्ये मेळावा आयोजित केला होता. लवकरच ठाण्यामध्ये हा मेळावा होईल. महाराष्ट्र हे उद्योगाभिमुख, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि प्राधान्य देणारे राज्य आहे. त्यामुळेच राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत आहे. दावोसमध्ये ३ लाख ८३ हजार कोटींचे सामंजस्य करार केले असून यातून अनेक रोजगार निर्माण होतील, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेद मनी, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे सचिव अतुल तिवारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाला कौशल्य विकास विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगांबर दळवी, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील, राज्यातील १५ जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधी, विश्वकर्मा केंद्राचे संचालक, स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मी काँग्रेससोबतच!

आमदार झिशान सिद्दीकी यांचे स्पष्टीकरण

विशेष प्रतिनिधी/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय गणित घालण्याचे काम वेगात सुरू आहे. यानिमित्ताने विधानसभेचीही आखणी केली जात आहे. विशेषतः सत्तेच्या जोरावर विरोधकांना जाळ्यात ओढण्याचे काम वेगात सुरू आहे. त्यातल्या त्यात महायुतीचे मुंबईवर अधिक लक्ष आहे. या अगोदर माजी खासदार मिलिंद देवरा यांना शिंदे गटात घेऊन काँग्रेसला धक्का दिला. आता काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकी यांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे वडील बाबा सिद्दीकी अजित पवार गटात जाणार असल्याचे बोलले जात होते. दरम्यान, आमदार झिशान सिद्दीकी यांनी आपण काँग्रेसमध्येच असल्याचे स्पष्टीकरण दिले. त्यामुळे तूर्त यावर पडदा पडला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी अजित पवार गटात जाणार असल्याचे बोलले जात होते. त्यामुळे त्यांच्यासोबत काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकीदेखील जाणार का, यावरून चर्चा रंगली होती. त्यामुळे मुंबईत काँग्रेसला आणखी एक धक्का बसतो की काय, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. परंतु, आता खुद्द आमदार झिशान सिद्दीकी आपण काँग्रेस सोडून कुठेही जाणार नाही, असे म्हटले. त्यामुळे तूर्त तरी या चर्चेवर पडदा पडला आहे. यावेळी सिद्दीकी यांनी, आमचे अजित पवार यांच्यासोबत कौटुंबिक संबंध आहेत. त्यांनी मला नेहमीच मदत केली आहे. यापुढेही ते मला मदत करीत राहतील. याचा अर्थ आम्ही त्यांच्या गटात जाणार असल्याची चर्चा चुकीची आहे, असेही ते म्हणाले. बाबा सिद्दीकींबाबत आमदार सिद्दीकी यांना विचारले असता मी फक्त स्वतःबद्दल सांगू शकतो. वडिलांची काय भूमिका आहे, ती त्यांना जाऊन विचारा, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांनी आगामी काळात काहीही होऊ शकते. असे सांगून ते अजित पवार गटाची वाट सुकर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, काँग्रेसने याबाबत सावध पवित्रा घेतला आहे.

यंदा चांगला पाऊस पडणार

भारतीय हवामान खात्याचा अंदाज

पुणे : प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती फेब्रुवारी महिन्यातही सक्रिय राहण्याचा अंदाज आहे. मात्र, फेब्रुवारीनंतर एल-निनो स्थिती हळूहळू कमजोर पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे.

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात एल-निनोची स्थिती कायम आहे. तेथील समुद्रातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्तच आहे. फेब्रुवारीअखेरपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारीनंतर एल-निनो स्थिती हळूहळू कमजोर पडण्याचा अंदाज आहे. तसे झाल्यास यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे. तसेच हिंदी महासागरातील द्वि-धुव्रिताही सध्या सक्रिय आहे. पुढील एक-दोन महिन्यांत ही स्थिती तटस्थ अवस्थेत पोहचण्याची शक्यता आहे.

फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरी २२.७ मिमी पाऊस पडतो, सरासरीच्या तुलनेत ११९ टक्के पावसाचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

मागील वर्षभर किमान तापमान सरासरीपेक्षा जास्तच राहिले होते. जानेवारी महिन्यात किमान तापमान सरासरीपेक्षा एक ते तीन अंश सेल्सिअसने जास्तच राहिले आहे. फेब्रुवारी महिन्यातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमान देशभरात जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्यात मुंबई, किनारपट्टी वगळता कमाल तापमान सरासरी इतकेच राहण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात उत्तर भारतात थंडीची लाट येण्याची शक्यता कमीच आहे.

गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने फसवणूक

मुंबई : गुंतवणुकीवर चांगला परवाता देण्याच्या आमिषाने एका जोडप्याला सुमारे ७२ लाखांना गंडा घालणाऱ्या कोल्हापूरच्या तीन भामट्याविरुद्ध कसतुरबा मार्ग पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. देशभुषण बळवंत देशमाने, प्रितम देशभुषण देशमाने आणि राजेंद्र भीमराव नेर्लीकर अशी या तिघांची नावे असून ते तिघेही कोल्हापूरच्या उत्तर आजरा आणि हुपरीचे रहिवाशी असल्याचे पोलिसांनी सांगितले. मीनल धनपाल सेठ ही महिला बोरिवली येथे राहत तिचे पती एका खासगी कंपनीत कामाला आहेत. २०२१ साली ती तिच्या पतीसोबत कर्नाटकच्या हुबली येथील जैन मंदिरात गेली होती. तिथेच त्यांची ओळख जैन मुनी नमित सागरजी महाराज यांच्याशी झाली होती. त्यांनी अनेकदा त्यांना कौटुंबिक जीवनाबाबत चांगले मार्गदर्शन केले होते. त्यामुळे ते नियमित जैन मंदिरात दर्शनासाठी जात होते. दोन वर्षांपूर्वी महाराजांनी त्यांची ओळख देशभूषण व त्यांचा मुलगा प्रितम, राजेंद्रशी करुन दिली होती. ते तिघेही कोल्हापूरचे रहिवाशी असून, ते तिघेही महाराजांचे भक्त आहेत. या ओळखीत त्यांनी ते बडे गुंतवणुकदार असून, त्यांचा फॉरेक्स ट्रेडिंगचा व्यवसाय आहे.

मराठा सर्वेक्षणाला आव्हान देणार

पुणे : मराठा आरक्षणासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या सर्वेक्षणाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी सांगितले.

मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार, कुणबी प्रमाणपत्रे देऊन मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण दिले जात आहे. मराठा समाजातील ज्या व्यक्तींकडे कुणबी प्रमाणपत्रे असतील त्यांच्या सग्यासोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्रे मिळण्याची अधिसूचना शासनाने काढली आहे. त्याचवेळी मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे सर्वेक्षण २३ जानेवारीपासून सुरू करण्यात आले. हे सर्वेक्षण शुक्रवारी पूर्ण झाले. त्याचा अहवाल लवकरच येणार आहे. परंतु, या अहवालास न्यायालयात आव्हान देण्याचा इशारा राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

हाके म्हणाले, राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल हा खोटा आहे. या अहवालाला चॅलेंज करणार आहोत. मुंबई हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात या अहवालास आव्हान दिले जाणार आहे. या अहवालाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणासंदर्भातील क्युरेटीव्ह पिटीशनच्या वेळी बाजू मांडण्यात येणार आहे. परंतु, त्या अहवालास आव्हान दिले गेल्यास सरकारपुढे अडचणी निर्माण होणार आहेत.

मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांचा इशारा

लक्ष्मण हाके यांना धमक्या

मराठा आरक्षणाच्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे प्रा. लक्ष्मण हाके यांना धमकीचे फोन येत आहेत. त्यांना जीवे मारण्याचे कॉल येत आहेत. यासंदर्भात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

मराठा आरक्षणासाठी मुंबईतील ३९ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यासाठी मुंबई मनपाचे ३० हजार कर्मचारी शहर आणि उपनगर जिल्ह्यात घरोघरी फिरून सर्वेक्षण करत आहेत. अगदी सुट्टीच्या दिवशीही हे सर्वेक्षण करण्यात आले. खुल्या गटातील किंवा आरक्षणाचा लाभ नसलेल्या कुटुंबाला पूर्ण १६० प्रश्न विचारून त्यांची ॲपवर स्वाक्षरी घेण्याची प्रक्रिया करण्यात आली.

१० महिन्या पासून बेपत्ता असलेल्या आणखीन एक मुलींला शोधण्यात यश

दैं.जनप्रभात
उपसंपादक/ राठोड रमेश पंडित

लातूर:- लातूर जिल्ह्यातील बेपत्ता मुलींचा शोध घेण्याच्या संदर्भात विशेष पथक कार्यरत असून अनेक मुलींचा शोध लागला आहे. गेल्या दहा महिन्यापासून बेपत्ता असलेल्या आणखी एका मुलीला शोधण्यात या पथकाला यश आले आहे. याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, सन २०२३ मध्ये पोलीस ठाणे औसा येथे अल्पवयीन मुलीचा अपहरण झाल्याच्या तक्रारीवरून भादवि कलम ३६३ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस नमूद मुलीचा शोध घेत होते परंतु ती मिळून येत नव्हती.पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी बऱ्याच कालावधीपासून तपासावर असलेले, आतापर्यंत मिळून न आलेल्या मुला–मुलींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला आदेशित करून सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक करण सोनकवडे, महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख व पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी हे त्यांच्या पथकामार्फत वरील गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते. सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना अपहरण झालेल्या मुली संदर्भात खूप काही उपयुक्त माहिती नसतानाही या विशेष पथकाने अपहरण झालेल्या मुलीचा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात जाऊन शोध घेतला. तसेच सायबर सेलच्या मदतीने मिळालेल्या



माहितीचे विश्लेषण करून विविध ठिकाणी सदर मुलींचा शोध घेऊन, ती शनी शिंगणापूर, दहिवडी, माण, मालवाडी, परिसरात शोध घेऊन ती मिळून आल्याने तिला पोलिस ठाणे औसा येथे हजर करण्यात आले आहे. पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस निरीक्षक करण सोनकवडे, महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, पोलीस अमलदार प्रकाश जाधव, सुधामती वांगे, योगी,मापोना गिरी,चालक बुढे तसेच सायबर सेल चे गणेश साठे यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.



वकील दाम्पत्याच्या हत्येचा निषेध करीत संघटनांचे आंदोलन

मुंबई : वकिलांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटना वाढत आहे, त्या थांबाव्यात व अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथील राजाराम आढाव (५२) व मनीषा आढाव (४२) या वकील दाम्पत्याचे अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेच्या निषेधार्थ मुंबईतील शहर सत्र व दिवाणी न्यायालयातील वकिलांच्या संघटनेने शुक्रवारी आझाद मैदानात आंदोलन केले. वकील संरक्षण कायद्याच्या मागणीचे सरकारला वेळोवेळी निवेदन दिले आहे. याबाबत राज्य सरकारकडून ठोस उपाययोजना होत नाही. आता जर मागणी मान्य केली नाही, तर हा मोर्चा मंत्रालयावर घेऊन जाण्यास आम्ही मागे पुढे पाहणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

अज्ञात व्यक्तीचा गुन्हे शाखेसह एटीएसकडून शोध सुरू

मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोटाची धमकी

मुंबई : शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोट होणार असल्याचा असल्याचा धमकीचा मॅसेज मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला प्राप्त झाल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. दरम्यान, धमकीचा मॅसेज देणाऱ्या व्यक्तीच्या अटकेसाठी गुन्हे शाखेसह एटीएसने विशेष मोहीम हाती घेतली आहे. गेल्या काही दिवसांत बॉम्बस्फोट होणार असल्याच्या निनावी कॉल आणि मॅसेजमुळे मुंबई पोलिसांवर प्रचंड ताण येत असल्याचे एका अधिकाऱ्याने बोलताना सांगितले. गुरुवारी रात्री वरळी येथील



वाहतूक पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला एका व्हॉट्सॲप क्रमांकावरून एक मॅसेज प्राप्त झाला होता. त्यात आम्ही मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्ब ठेवले असून, या बॉम्बचा कुठल्याही क्षणी स्फोट होईल, असे नमूद करण्यात आले होते; मात्र सहा बॉम्बस्फोट कुठे आणि कधी होणार आहेत, याबाबत काहीच माहिती देण्यात आली नाही. संबंधित व्यक्तीची स्वतःची ओळख सांगितली नाही. ज्या मोबाईल क्रमांकावरून हा मॅसेज आला आहे, तो कोड पाकिस्तानाचा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. ही माहिती नंतर संबंधित पोलिसांनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली होती. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत मुंबई शहरातील बंदोबस्तात वाढ करण्याचे आदेश दिले आहेत.

मुलीच्या संरक्षणासाठी धावून आला सुरक्षारक्षक

मुंबई : आजही शहरात महिला, मुली असुरक्षित आहेत. याचे जिवंत उदाहरण म्हणजे विक्रोळी येथे घडलेली एक दुर्देवी घटना होय. रस्त्यावरून जाणाऱ्या एका मुलीला एका पुरुषाने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला असता त्या नराधमाला एका सुरक्षारक्षकाने आपल्या कर्तव्याचा हिसका दाखवत त्या मुलीला सुरक्षित केले. या घटनेमुळे महाराष्ट्र शासन स्थापित सुरक्षारक्षक मंडळातील सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.



सहाय्यक पोलीस आयुक्तांकडून कौतुक

सुरक्षारक्षक समीर कोळवणकर कामावरून घरी बसने निघाले होते. कन्नमवार नगर विक्रोळी स्टेशनवरून जाणारी बेस्ट बस कन्नमवार नगरच्या दिशेने जात असताना टागोर नगरला जाणाऱ्या रस्त्यावरील बस स्टॉप जवळ एक विकृत पुरुष रस्त्यावरून चालणाऱ्या एका २५ वर्षीय मुलीला पाहून लैंगिक चाळे करून हावभाव करत असताना ती मुलगी घाबरून पळू लागली. तो तिला पकडायला धावला त्यावेळेस सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांनी प्रसंगावधान दाखवत त्या मुलीचे संरक्षण केले. पुढील गंभीर घटना कोळवणकर यांच्यामुळे टळली. ही घटना त्यांनी सोशल मीडियावर टाकली होती. तसेच विक्रोळी पोलीस ठाण्यामध्ये आणि डीसीपी ऑफिसला जाऊन लेखी सूचना केली होती. या प्रकरणाची दखल सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी घेत सुरक्षारक्षक कोळवणकर यांचे प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.

व्रत करणाऱ्याने पाळावयाचे नियम (व्रतपरिभाषा)



व्रत अंगिकारल्यावर ते फलद्रूप होण्यासाठी काही नियम पाळणे आवश्यक ठरते. या नियमांचा भंग झाल्यास पाप लागू नये; म्हणून प्रायश्चित्तही घ्यावे. व्रताचरण करताना पाळावयाचे नियम आणि बंधने याविषयीची माहिती खालील लेखातून जाणून घेऊया.



डोळसपणा हवा

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' असे म्हटले आहे, ते अक्षरशः सत्य होय. व्रत हे अंधपणाने घ्यायचेच नसते. अजाणपणा आणि अज्ञान त्याविषयी चालत नाही. डोळे उघडे ठेवून ते स्वीकारावे लागते.

कठोर पालन

व्रताचे पालन काटेकोरपणाने व्हावे लागते. मग त्यासाठी किती कष्ट करावे लागतील, याचा विचार मनात येता उपयोगी नाही.

पूर्ण करणे आवश्यक

अशौच

पुष्कळ दिवस आधी व्रताचा संकल्प केला आहे आणि अशा वेळी –

- जन्ममरणाचे सोयरसुतक आले, तर व्रताला त्याचा बाध येत नाही. व्रतकालात सुतक आले, तर त्यातून सुटका होण्यासाठी दानधर्म आणि पूजा सांगितली आहे. कित्येक व्रतांत दान, धर्म आणि पूजा तिन्ही असतात. गणेश चतुर्थी, अनंत चतुर्दशी आणि अर्कसप्तमी या व्रतांत व्रतदेवतेची पूजा, वाण आणि दान सांगितलेली आहेत. अशा व्रतांत अशौच
- आले, तरी व्रत करावे; पण दानधर्म आणि पूजा करू नयेत.

एखाद्या व्रताचे पालन करत असताना स्त्री रजस्वला झाली, तर त्यामुळे व्रतात अडथळा येत नाही.'

करवितां व्रत अर्धपुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती ॥
तुका म्हणे तपतीर्थव्रतयाग ।
भक्ती हे मार्ग मोडूं नये ॥

- संत तुकाराम महाराज

अर्थ : एखाद्याने व्रताला आरंभ केला, तर ते व्रत त्याने पूर्ण केलेच पाहिजे; कारण जर त्याने निष्काळजीपणाने ते व्रत मध्येच सोडून दिले, तर फार मोठे वाईट परिणाम होतील, असे धर्मग्रंथांत सांगितले आहे. व्रत तुटले, सुटले तर त्याला 'प्रायश्चित्त' सांगितलेले असते. 'प्रायश्चित्त' म्हणजेच 'पश्चात्ताप' असेच समीकरण आज मांडायला हवे. चुकून व्रतभंग झाल्यास तीन दिवस उपोषण आणि पुरुषाने क्षौर करून (केस कापून) पुन्हा व्रत करावे.

नियम

दात घासणे : उपवासाच्या दिवशी आणि श्राद्धाच्या दिवशी दात घासू नयेत. आवश्यकता वाटल्यास पाण्याने गुळण्या कराव्यात. बारा चुळा भराव्यात अथवा आंब्याच्या पानाने, काष्ठाने किंवा बोटाने दात स्वच्छ करावेत.

स्नान : प्रतिदिन स्नान केले पाहिजे. वायू सरला असता, जोरात रडल्यावर, रागावल्यावर, उंदीर आणि मांजर यांना शिवल्यावर, मोठ्याने हसल्यानंतर अन् खोटे बोलल्यानंतर आंघोळ करणे आवश्यक आहे.

वस्त्र आणि अलंकार : व्रत आचरत असतांना गंधफूल, माळा, कापड आणि व्रतयोग्य असे अलंकार धारण करावेत. व्रतपूजा करत असताना किंवा होम इत्यादी करत असताना केवळ एक वस्त्र धारण न करता उपवस्त्रही घ्यावे. याहून अधिक वस्त्रे धारण करून मंत्रोच्चार, जप किंवा होम इत्यादी करणे योग्य नाही. मंत्र किंवा जपामुळे अंगात निर्माण होणाऱ्या उष्णतेचा त्रास होऊ नये; म्हणून हा नियम आहे. व्रत करणारा पुरुष असो अथवा सौभाग्यवती स्त्री, व्रताचे संपूर्ण आचरण करत असतांना त्याने किंवा तिने लाल वस्त्र आणि सुगंधित पांढरे फूल धारण करावे. ब्राह्मणाने पांढरे स्वच्छ, क्षत्रियाने केशरी, वैश्याने पिवळे आणि अन्यांनी निळे अथवा कोणत्याही रंगाचे कापड वापरावे. तीन कासोट्यांचे धोतर परिधान करणे उत्तम होय. धोतर नेसणारा ब्राह्मण 'मुनीराज' असतो. ध्वजासारखे, ग्रंथीयुक्त (गाठ मारलेले) धोतर नेसणे योग्य नाही.

दिवसभरात योग्य वेळी करावयाच्या कृती : जप, भोजन आणि मलमूत्रत्याग योग्य वेळी करावा.

आचमन : मोहात, विचारात गुंतून व्रत करणारा आचमन करायचे विसरला, तर त्याचे व्रत व्यर्थ होते. आंघोळ करताना, खाताना, पिताना आणि बाहेरून हिंडून आल्यावर जरी आचमन केले असले, तरीसुद्धा दुसऱ्यांदा आचमन केले पाहिजे.

देवतापूजन : ज्या देवतेच्या प्रीत्यर्थ एखादे व्रत अंगिकारलेले असेल, त्या देवतेची पूजा करावी. तिचा जप, ध्यान, कथाश्रवण, अर्चन, कीर्तन, धार्मिक ग्रंथवाचन इत्यादी करावे.

आहार

- मर्यादित असावा. पाणीही अनेकदा पिऊ नये.
- हविष्यान्न : पाणी, फळ, मूळ, दूध, ब्राह्मणाची इच्छा, औषधसेवन अणि गुरुवचन यांनी व्रताला बाधा येत नाही. होमासाठी केलेली खीर, भिक्षेचे अन्न, जवस, भाजीपाला (दोडका, काकडी, मेथी इत्यादी), गायीचे दूध, दही, तूप, मुळा, आंबा, डाळिंब, मोसंबी, संत्री आणि केळी इत्यादी पदार्थ व्रतकालात खाण्यास योग्य होत.
- क्षार, लवण, मध आणि मांस यांचे सेवन करता कामा नये.
- स्त्रिया आणि शुद्र यांना दोन दिवसांपेक्षा अधिक दिवस उपवास करण्याचा अधिकार नाही.

पथ्ये : पुढील गोष्टी करू नयेत-

- शरीराला आणि मस्तकाला तेल लावणे, अभ्यंगस्नान,
- विडा खाणे,
- अंगाला उटी लावणे,
- ज्या गोष्टींच्या योगाने शारीरिक सामर्थ्य अथवा मनोविकार बळावतील अशा गोष्टी,
- राग, लोभ, मोह अणि आळस,
- धूम्रपान,
- दिवसा झोपणे आणि
- चोरी करणे.

ब्रह्मचर्यपालन करणे : चातुमार्सात ब्रह्मचर्यपालन करावे.

वाहनाने प्रवास वर्ज्य : व्रत करणाऱ्याने बैल, उंट आणि गाढव यांवर बसू नये. (म्हणजे वाहनाने प्रवास करू नये.)

गुणांची जोपासना : क्षमा, सत्य, दया, दान इत्यादी गुणांची जोपासना करावी.

पूजा करणे : गुरू, देव आणि ब्राह्मण यांची पूजा अन् सत्कार करावा.

भोजन घालणे : ब्राह्मणभोजन घालावे. सुवासिनी स्त्रिया आणि कुमारिका यांना भोजन घालावे.

दान करणे : गायी, द्रव्य, अलंकार इत्यादींचे दान करावे.

अन्नदान : अंध, दरिद्री आणि पंगू यांना अन्न द्यावे. 'कालिका पुराणा'मध्ये असा नियम सांगितला आहे की, व्रताच्या दिवशी चवदार आणि स्वादिष्ट अन्न अन् पेये अनाथ, अंध आणि बधिर यांना मुक्तहस्ताने वाटावीत. 'एखादे व्रत आचरण करत असणाऱ्याने अंध, संकटग्रस्त आणि असाहाय्य लोकांना आपल्या सामर्थ्यानुसार अन्नदान करावे', असे भविष्यपुराणामध्ये सांगितले आहे.

घराच्या या दिशेला कढीपत्त्याचे रोप लावल्यास सुख-समृद्धी येते



वास्तुदोष दूर करण्यासाठी आणि कुटुंबात सुख-शांती टिकवून ठेवण्यासाठी वास्तुशास्त्रात अनेक उपाय आहेत. झाडे आणि वनस्पती आपल्या जीवनात अनेक फायदे देतात. काही लोकांना झाडे आणि रोपे खूप आवडतात, अशा परिस्थितीत ते घराच्या कोणत्याही भागात लावतात.

ते अज्ञानातून हे करतात, परंतु त्यांना त्याचे खूप नकारात्मक परिणाम भोगावे लागतात. वास्तूनुसार योग्य दिशेने झाडे आणि रोपे लावावीत, ज्यामुळे सुख-समृद्धी मिळेल. घराच्या कोणत्या दिशेला कढीपत्त्याची रोपे लावावीत हे जाणून घ्या. ते अत्यंत शुभ मानले जाते. वास्तुशास्त्रानुसार घराच्या पश्चिम दिशेला झाडे लावावीत. पश्चिम ही चंद्राची दिशा आहे. या दिशेला कढीपत्ता लावल्यास आरोग्याला फायदा होईल.

कढीपत्ता अनेक प्रकारे फायदेशीर आहे

ज्योतिषशास्त्रानुसार कढीपत्ता आरोग्यासाठी जितका फायदेशीर मानला जातो तितकाच फायदेशीर आहे. कढीपत्त्याचे सेवन केल्याने कर्करोग आणि मधुमेह बरा होतो. कढीपत्त्यात अँटी-म्युटेजेनिक गुणधर्म असतात. त्यामुळे पोटाचा कर्करोग टाळण्यास मदत होते. हृदयविकारात फायदेशीर आहे. कढीपत्ता दृष्टी सुधारण्यास मदत करते.

सरकारनं २० वर्ष जुन्या वाहनांसाठी स्क्रॅपिंग पॉलिसी लागू केली आहे, त्याप्रमाणे ५ वर्ष जुन्या फोनच्या वापरावर देखील बंदी येणार असल्याचा मेसेज सोशल मीडियावर फिरत आहे. जो पूर्णपणे खोटा आहे.

सरकारनं १५ वर्ष जुन्या कमर्शियल आणि २० वर्ष जुन्या खासगी वाहनांसाठी स्क्रॅपिंग पॉलिसी लागू केली आहे. म्हणजे २० वर्ष जुन्या वाहनांना स्क्रॅप करणं अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे मोबाईल फोन स्क्रॅपिंग पॉलिसी लागू केली जाणार आहे. ज्यामुळे तुमच्या ५ वर्षांपेक्षा जुन्या फोनच्या वापरावर बंदी घातली जाईल. यामागे फोनचा माहिती देखील दाखवली जाते. हा दावा दूरसंचार विभागाच्या हवाल्याने केला जात आहे, परंतु दूरसंचार विभागाने ५ वर्ष जुने फोन बंद करण्याचे कोणतीही आदेश जारी केले नाहीत. तुम्ही तुमची इच्छा असेपर्यंत तुमचा स्मार्टफोन वापरू शकता.



५ वर्ष जुने फोन होणार बंद? सरकारनं आणली नवीन मोबाईल स्क्रॅप पॉलिसी? जाणून घ्या सत्य

स्पेशिफिक ऑब्जर्व्हेशन रेट म्हणजे एसएआर व्हॅल्यू कारणीभूत असल्याचा एक मेसेज सोशल मीडियावर वायरल होत आहे. चला जाणून घेऊया त्यामागील सत्य.

खोटा आहे मेसेज : सरकारनं मोबाइल स्क्रॅप पॉलिसी लागू केल्याचा दावा सध्या सोशल मीडियावर खासकरून इंस्टाग्रामवर केला जात आहे. परंतु हा दावा पूर्णपणे खोटा आहे, कारण सरकारनं आधीच एसएआर व्हॅल्यूचे स्टँडर्ड निश्चित केले आहेत, ज्यांचे पालन प्रत्येक स्मार्टफोन कंपनीला करावे लागते. त्याचबरोबर स्मार्टफोन बॉक्सवर एसएआर व्हॅल्यूची

एसएआर व्हॅल्यू म्हणजे काय : मोबाइल फोनमधून निघणारं रेडिएशन किती आहे? याचं मोजमाप म्हणजे एसएआर व्हॅल्यू. प्रत्येक डिव्हाइससाठी वेगळी एसएआर व्हॅल्यूची मर्यादा ठरवण्यात आलेली आहे. परंतु साधारणतः एखाद्या डिव्हाइसची एसएआर व्हॅल्यू १.६ W/Kg पेक्षा जास्त असू नये, असं मानलं जातं. हा कोणतीही नवीन नियम नाही आणि हा भारत सरकारनं १ सप्टेंबर २०१३ रोजीच लागू केला आहे. विशेष म्हणजे बाजारातील बहुतांश मोबाएर्ल या मर्यादेच्या आतच एसएआर व्हॅल्यूसह येतात, त्यामुळे तुम्हाला घाबरण्याचे कारण नाही.

एसएआर व्हॅल्यू कशी चेक करायची फोनच्या बॉक्सवर प्रत्येक डिव्हाइसची एसएआर व्हॅल्यू दिली जाते. परंतु जर तुमच्या बॉक्सवर ही व्हॅल्यू दिसत नसेल तर तुम्ही ती सहज जाणून घेऊ शकता. त्यासाठी तुम्हाला स्मार्टफोनमध्ये *#07# डायल करावं लागेल, म्हणजे तुमच्या डिस्प्लेवर एसएआर व्हॅल्यू सहज दिसू लागेल.

केसांना फाटे फुटण्याच्या समस्येवर ५ झटपट घरगुती उपाय



अतिशय वाईट दिसणाऱ्या आणि फाटे फुटलेल्या केसांवर हा अगदी रामबाण उपाय आहे.

पपईचं पॅक – प्रोटीन आणि अमिनो ॲसिडचं प्रमाण पपईमध्ये जास्त प्रमाणात असल्यामुळे, मुळापासून केस चांगलं राखण्यास मदत होते. यासाठी तुम्हाला पपई नीट वाटून घ्यायची आहे. त्यानंतर त्यामध्ये अर्धा कप दही घेऊन नीट मिक्स करा. हे पॅक तुम्ही साधारण ४५ मिनिटं लावा. त्यानंतर केसांना नीट शॅम्पूने धुवा. आठवड्यातून तुम्ही एकवेळ असं केल्यास, लवकरच तुम्हाला केसांच्या फाटे फुटण्याच्या समस्येपासून सुटका मिळेल.

गरम तेलाने मालिश – केसांवर करण्यात आलेल्या मालिशमुळे डोक्यातील रक्तप्रवाहदेखील चांगला राहतो. त्यामुळे केसांचा लवकर विकास होतो आणि केस वाढतात. नियमित स्वरूपात घरामध्ये तेल गरम करून व्यवस्थित मालिश करा आणि त्यानंतर तुमचे केस गरम टॉवेलमध्ये बांधून थोडा वेळ तसेच राहू द्या. थोडा वेळ जाऊ दिल्यानंतर केस शॅम्पूने धुवा.

अंड्याचं मास्क – अंड्याचा मास्क बनविण्यासाठी एक अंड (बलकासह), एक चमचा दही, त्यामध्ये अर्ध्या लिंबाचा रस घ्या आणि मिक्स करून तुमच्या केसांना साधारण ४५ मिनिटे लावून ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने केस धुवा. असं आठवड्यातून एकदा नक्की करा. हे उपाय अगदी नैसर्गिक असल्यामुळे याचा केसांवर कोणताही विपरित परिणाम होणार नाही. मात्र तुम्हाला केसांसंबंधी काही अन्य समस्या असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेऊन मगच हे उपाय करा.

यात काही वेळा या गोष्टींचा केसांवर चांगला परिणाम होतो, तर कधी या केमिकल्सचा केसांवर विपरीत परिणामही होतो. म्हणूनच आम्ही आज तुम्हाला असे ५ घरगुती उपाय सांगणार आहोत ज्यात कुठल्याही प्रकारचे केमिकल्स नसून त्या अगदी नैसर्गिक आहेत.

कोरफड – कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्व असतात. ज्यामुळे केसांना फाटे फुटण्याचं प्रमाण कमी होतं. त्यासाठी तुम्हाला कोरफड जेलमध्ये एक चमचा लिंबाचा रस आणि दोन चमचे एरंडेल तेल मिसळून घ्यायचं आहे. आता हे मिश्रण घेऊन केसांना मसाज करा. मसाजनंतर साधारण अर्धा तास हे मिश्रण केसांवर तसंच राहू द्या. त्यानंतर केस शॅम्पूने धुवून टाका.

केळं फायदेशीर – एक केळं मिक्सरमधून नीट वाटून घ्या आणि त्यामध्ये थोडं एरंडाचं तेल मिक्स करा. तसंच त्यामध्ये २ मोठे चमचे दूध आणि थोडा मध घालून मिक्स करून घ्या. हा मास्क आठवड्यातून एकदा साधारण अर्धा तास लावून ठेवा आणि नंतर कोमट पाण्याने धुवून टाका.

केसांना फाटे फुटण्याची समस्या अनेक महिलांमध्ये, मुलींमध्ये दिसून येते. मुळात केसांना वापरण्यात येणारे केमिकल्स आणि हेअर स्ट्रेटनर यामुळे केसांना फाटे फुटण्याचा धोका जास्त असतो. केसांना फाटे फुटणे म्हणजे केस दोन भागात विभागणे हे आहे. केसांना फाटे फुटल्यामुळे केस रुक्ष होतात आणि केसांची वाढही खुंटते. फाटे हे केसांना कुठेही फुटू शकतात. पण शक्यतो लांब केसांच्या शेवटच्या टोकाला फुटतात. केसांना फाटे फुटण्याच्या समस्येमुळे केसांचा आकार बदलतो आणि केसांचे सौंदर्यही कमी होते. अशा वेळी त्यांची योग्य ती काळजी घेणे जरुरीचे आहे. यात केसांना फाटे फुटू नये म्हणून आपण वेगवेगळ्या शॅम्पू किंवा केमिकल्स वापरून तुम्ही त्वरित उपाय करण्याचा प्रयत्न करतात.

शुगर फ्री, लो कॅलरी पदार्थ खाताना जरा सावधान...



वेटलॉससाठी, मधुमेहासाठी शुगर फ्री, लो कॅलरी असे पर्याय उपलब्ध झाल्याने आनंद वाटून घेत असाल तर जरा थांबा...कारण शुगर फ्री, लो कॅलरी पदार्थांमुळे वजन कमी होत असलं तरी ते तुमच्या शरीराला घातक आहे.

शुगर फ्री बिस्कीट, टोस्ट, ज्यूस किंवा लो कॅलरी प्रोडक्टमुळे मधुमेहापासून दूर राहू, वजन कमी करू असं आपल्याला वाटतं. मात्र याचा जास्त वापर आपल्याला सरळ मधुमेहाच्याच दिशेने घेऊन जातो हे फार कमी जणांना माहितेय. न्यूयॉर्क आणि ऑस्ट्रेलियामध्ये केलेल्या संशोधनातून हे सिद्ध झालं आहे. गेल्या २० वर्षांत शुगर फ्री पदार्थ घेण्याचं प्रमाण ५४ टक्क्यांनी वाढलंय. तर लहान मुलांनाही शुगर फ्री पदार्थ खाऊ घालण्याचं प्रमाण २०० टक्क्यांनी वाढल्याचं समोर आलं आहे. म्हणूनच लहान मुलांमध्येही आजकाल मधुमेह सर्रास आढळून येतोय. कोणतीही गोष्ट प्रमाणाबाहेर गेल्यास त्याचे दुष्परिणाम हे दिसतातच. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा अतिवापर टाळणं आणि आरोग्याबाबत वेळीच सावधानता बाळगणं आवश्यक आहे.

अधिक मिठाच्या सेवनाने हृदयासंबंधित आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य प्रमाणात मिठाचे सेवन करणे गरजेचे. तुम्हाला डिहायड्रेशनची समस्या जाणवत असेल तर तुम्ही मिठाचे अधिक सेवन करता. जेवणात अधिक मिठाचा वापर केल्यास डिहायड्रेशनची समस्या उद्भवते.

अधिक मीठ सेवन अपायकारक

जिभेवर छाले झाले असल्यास हे करा...

कित्येकदा उष्णतेमुळे किंवा पोट खराब झाल्यामुळे तोंडात फोड किंवा छाले होतात. एका बाजूला छाले झाले असल्यास आपण दुसऱ्या बाजूनं जेवू शकतात, पण जिभेवर छाले झाल्यावर खाण्यापिण्याचा भलताच त्रास होऊ लागतो. जिभेवर छाले झाल्यावर दातांना जीभ स्पर्श झाल्यावर वेदना होऊ लागतात आणि बोलतानाही त्रास होतो. म्हणून यापासून सुटका मिळवण्यासाठी काही सोपे उपाय:

दिवसभर पाणी प्यावे. मिठाच्या पाण्याचा गुळण्या कराव्या.


थंड गार पदार्थांचे सेवन करा. जसे दही, ताक, फळांचा ज्यूस, आइस्क्रीम इत्यादी.

गरम आणि तिखट पदार्थ खाणे टाळा. मसालेदार जेवण केल्याने वेदना होतील. जेवणात मिठाची मात्रा कमीच ठेवा.

चहा, कॉफीसारखे पेय पदार्थ टाळा. सोडा, कोल्ड्रिंक घेणेही टाळा.

अनावश्यक बोलणे टाळा, ज्याने जखम वाढणार नाही.

माऊथवॉश वापरून गुळण्या करा.



तुम्ही काय खाता, कसं खाता यामुळेही वाढतो मधुमेहाचा धोका

तुम्हाला वाटत असेल की, तुम्ही साखर कमी खाता, तर तुम्हाला डायबिटीज म्हणजेच मधुमेह होणार नाही, तर तुम्ही चुकीचे आहात. तुमची लाईफस्टाइल तुम्ही काय खाता आणि कसं खाता या गोष्टींवर अवलंबून आहे. तुम्हाला डायबिटीज होण्याची शक्यता किती आहे. तुमच्या मधुमेहावर जर उपचार झाले असतील, तर तुम्हाला या गोष्टीवर जास्त लक्ष ठेवण्याची गरज आहे.



कँडललाइट डिनर आरोग्यासाठी धोक्याचं, अहवालातून आलं समोर

कँडललाइट डिनर या पाश्चात्य कल्पनेनं भारतातही मूळ धरलंय. आपल्या प्रिय व्यक्तीसोबत कँडललाइट डिनर करावं असं प्रत्येकाला वाटतं. पण हे कँडललाइट डिनर आरोग्यासाठी धोक्याचं असल्याचं एका पाहणी अहवालातून समोर आलं आहे. आवडत्या व्यक्तीसोबत कँडललाइट डिनर करायला कुणाला आवडत नाही. कँडललाइट डिनरसाठी काही लोक हजारो रुपये मोजतात. कँडललाइट डिनरचे क्षण खास असेच असतात. पण हेच कँडललाइट डिनर आरोग्यासाठी घातक असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे.

कँडललाइट डिनर धोकादायक व्हायला कारणीभूत आहे मेणबत्तीचा धूर. मेणबत्तीतून निघणारा धूर हा सिगारेटच्या धुरापेक्षाही धोकादायक असल्याचा निष्कर्ष साऊथ कॅरिलोना स्टेट युनिव्हर्सिटीनं काढला आहे. मेणबत्तीत पॅराफिन आणि अनेक घातक घटक असल्याचं डॉक्टर सांगतात.

मेणबत्तीचा हा धूर एवढा घातक आहे की, त्यामुळं फुफ्फुसांना हानी पोहचते. शिवाय कॅन्सरसारखा गंभीर आजारही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आता तुम्ही कितीवेळ मेणबत्तीच्या धुराच्या संपर्कात राहता यावरही आजार होणं अवलंबून आहे. कँडललाइट डिनरचे धोके लक्षात घेऊन कधीतरी एकदा कँडललाइट डिनर करायला हरकत नाही. पण यापासून स्वतःची काळजी घेणं देखीत तितकंच महत्त्वाचं आहे.

नाचो! वजन कमी ते तणाव दूर करण्यापर्यंत झुम्बा डान्सचे फायदे

व्यायाम जर कामासारखे केले तर कंटाळ येतो. व्यायाम करताना कोणता तणाव नसला पाहिजे. जर व्यायाम कमी आणि मस्ती जास्त असेल तर? ते काम फक्त हे झुम्बा डान्ससोबत होऊ शकतं. व्यायामाचा तुम्ही जेवढा आनंद घ्याल, तुम्ही त्याला तेवढ्या चांगल्या पद्धतीत करू शकाल.

झुम्बा डान्स तुमच्यासाठी एक मजेदार वर्कआऊट आहे, ज्यात तुम्ही मस्ती करत-करत वजन कमी करू शकतात.

झुम्बा डान्सच्या एका तासात ६०० ते १ हजार कॅलरीज बर्न करू शकतो. झुम्बा डान्स तुमच्या हृदयासाठी चांगला आहे. रोजच्या तणावाला विसरून तुम्ही डान्सवर लक्ष केंद्रित करून तणाव दूर करू शकतात.

झुम्बा डान्समध्ये तुमचे हात आणि पाय वेगवेगळ्या दिशेत असतात, यात समन्वय असणे गरजेचे आहे. झुम्बा डान्स सतत केल्याने तुमचा समन्वय चांगला होतो आणि तुम्हाला तुमच्या शरीराला हालचाल सहज करण्यास मदत होते.

झुम्बा डान्स हा मधुमेहासाठी तर उपयोगी आहेच, पण वजन कमी करण्यास देखील मदत करतो.



पवार महाविद्यालयात मराठवाडास्तरीय ग्रंथालय कार्यशाळेचे आयोजन

दै, जनप्रभात
परभणी / अरविंद कांबळे

पूर्णा (जं.) - प्रतिनिधी- येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून शासनमान्य मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघ व स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी विभागीय ग्रंथालय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उदघाटन सकाळी ११:०० वाजता ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे माजी आमदार गंगाधर पटणे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे अधिष्ठाता डॉ. उदय खोडके, पूर्णा येथील भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो व माजी नगराध्यक्ष उत्तमराव कदम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र कुंभार, प्राचार्य डॉ. नंदकुमार दहीभाते, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे, सहाय्यक ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजीनगरचे सुनील हुसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माहिती व ज्ञानस्त्रोत केंद्राचे माजी संचालक डॉ. धर्मराज वीर, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष भास्कर पिंपळकर आदी मान्यवर उपस्थित राहणार असून उदघाटन सत्रात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार यांच्या नावे देण्यात येणाऱ्या पाच पुरस्काराचे मान्यवरांचे हस्ते वितरणही करण्यात येईल. उदघाटन सत्रानंतर '' सार्वजनिक ग्रंथालयाचे ऑनलाईन अंकेशन व वार्षिक अहवाल'' या विषयावर होणाऱ्या पहिल्या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष खंडेराव सरनाईक हे राहणार आहेत तर मार्गदर्शक म्हणून परभणी जिल्हा ग्रंथालय माहिती अधिकारी अशोक ढोक, ग्रंथपाल डॉ. विलास काळे, परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे सचिव जीवन लोखंडे, परभणीचे ग्रंथालय निरीक्षक बाळासाहेब देवणे, '' ग्रंथालयातील अद्यावत व आधुनिक प्रणालीच्या करावयाची विविध कार्य '' या विषयावर होणाऱ्या दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष वसंतराव सूर्यवंशी राहतील तर वक्ते म्हणून प्रा.डॉ.अशोक कोलंबीकर, मराठवाडा ग्रंथालय संघाचे कार्यवाह संतोष ससे, लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष युवराज जाधव, बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुधीर चाटे. '' सार्वजनिक ग्रंथालया पुढील आव्हाणे '' या विषयावर होणाऱ्या तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह नरहरी मंठेकर तर वक्ते म्हणून मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे उपकार्याध्यक्ष अरविंद लंके, लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, नांदेड जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाहक राजेंद्र हंबीरे,जालना येथील राजाराम चव्हाण व श्याम सेलगावकर हे उपस्थित राहतील. समारोप सत्राच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले तर प्रमुख पाहुणे मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राजेंद्र सानप, लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, हिंगोली जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक डॉ. नामदेव दळवी, धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक ज्ञानेश्वर पाटील, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयाचे अधिक्षक अध्यक्ष अनिल बाविस्कर आदी मान्यवर उपस्थित राहतील. या मराठवाडास्तरीय ग्रंथालय कार्यशाळेत मराठवाड्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे अध्यक्ष गुलाबराव कदम, प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, सहसचिव अविनाश कोठाळे, डॉ. वसंत पवार. दत्तात्रय पवार व अनुसया शिक्षण प्रसारक मंडळ परभणी व स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि. परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

आ.डॉ.भोयर यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांनी केली महानाट्य व्यवस्थेची पाहणी

दै,जनप्रभात
वर्धा/प्रतिनिधी



: जिल्हा प्रशासन व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या समन्वयातून दि.६, ७ व ८ फेब्रुवारी रोजी स्वावलंबी मैदानावर 'जाणता राजा' महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. महानाट्याचा स्टेज उभारणीसह इतर व्यवस्थेचे काम सुरु झाले आहे. आज या व्यवस्थेची पाहणी आ.डॉ.पंकज भोयर यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली.यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक नूरुल हसन, तहसिलदार रमेश कोळपे, भारतीय पोलिस सेवेतील अधिकारी वृष्टी जैन आदी उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारीत या महानाट्यात २०० पेक्षा अधिक कलावंतांचा समावेश आहे. महाराजांच्या बालपणापासून ते राज्याभिषेकापर्यंतचा रोमांचकारी प्रवास महानाट्यातून पाहावयास मिळणार आहे. त्यासाठी स्वावलंबी मैदानात स्टेजसह प्रेक्षकांसाठी बैठक व्यवस्था, प्रवेश, पार्किंग, सुरक्षा, स्वच्छता आदींच्या उभारणीस सुरुवात झाली आहे. स्टेजचे काम अंतीम टप्प्यात आहे.आ.डॉ.पंकज भोयर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक नूरूल हसन यांनी महानाट्य स्थळाला संयुक्त भेट दिली. महानाट्यास येणाऱ्या प्रेक्षकांची सुरक्षा, बैठक व्यवस्था, स्वच्छता, प्रवेश आदींची पाहणी व माहिती त्यांनी घेतली. नाट्य प्रयोग शांततेत पार पडावे यासाठी पोलिस विभागाचा पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथक ठेवावे. येणाऱ्या प्रेक्षकांच्या वाहनासाठी पार्किंग व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी व्यवस्थेची यावेळी पाहणी करण्यात आली.महानाट्य विनामुल्य आहे, परंतू प्रेक्षकांना प्रवेशिकेवर प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद कार्यालयातून विनामुल्य उपलब्ध करून दिल्या जात आहे.

रयत बहुऊद्येशियसेवाभावी संस्थेचा त्सुत्य ऊपक्रम

महिला सक्ष्मिकरणासाठी विविधऊपक्रमाचे आयोजन

दै, जनप्रभात
अरविंद कांबळे / परभणी

ताडकळस:ताडकळस येथुन जवळच असलेल्या मौजे निळा येथे रयत बहुऊद्येशियसेवाभावी संस्थेच्या वतिने महिलांसाठी आर्थिकसाक्षरता ,ऊद्योजकता,व विविध शासकिय योजना शिबिराचे आयोजन केले असता या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन शेख ईम्राणसर तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंचसौ.प्रतिभा सुर्यवंशी यांची उपस्तीती होती कार्यक्रमाची सुरवात सावित्रीबाई फुले,जिजामाता यांच्या प्रतिमा पुजनाने झाली व ऊपस्तीत मान्यवरांचा सत्कार करण्यात आला . कार्यक्रमासाठी ऊपस्तीत मार्गदर्शक ईम्रानसर यांनी महिलांना आर्थिकसाक्षरतेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व गजानन सुरवसे यांनी ऊपस्तित महिलांना आर्थिकनियोजन,बचतआणि गुंतवणुक,विमा,पेन्शनडिजिटल साक्षरता,बँकिंग लोकपाल सुकन्यासमृध्दी योजना,रोजगार व स्वंयरोजगाराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले .व गावच्या सरपंच प्रतिभा सुर्यवंशी यांनी ऊपस्तित महिलांना हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेतला व महिलासक्ष्मिकरणासाठी कार्यकरणिर्या महिलांना संस्थेच्या वतिने सन्मानपत्र देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेखामासे,गोदावरी सुर्यवंशी,शिवकांता संगेकर आदी महिलांनी सहकार्य केले



यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारात काटोल पंचायत समिती राज्यात दुसरी

सभापती संजय डांगोरे यांचे कौतुक

दै,जनप्रभात
गौरव मानकर/प्रतिनिधी

काटोल : प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यातील उत्कृष्ट योगदानासाठी काटोल पंचायत समितीला राज्य शासनाच्या वर्ष २०२२-२३च्या यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत विभागातून पहिल्या क्रमांकाचा तर राज्यातून दुसऱ्या कम्रांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांतर्गत वर्ष २०२०-२१ साठी विभागस्तरातून भंडारा पंचायत समिती पहिल्या तर राज्यात तिसऱ्या स्थानावर राहिली आहे. या उभय पंचायत समित्यांसह अन्य पुरस्कार विजेत्यांना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते येत्या ५ फेब्रुवारी रोजी गौरविण्यात येणार आहे. यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत नागपूर विभागातील एकूण ६३ पंचायत समित्यांसाठी वर्ष २०२०-२१ आणि वर्ष २०२२-२३ च्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण श्रीमती बिदरी यांच्या हस्ते ५ फेब्रुवारी



२०२४ रोजी वंसतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) येथे सकाळी ११ वाजता होणार आहे.वर्ष २०२२-२३च्या राज्यस्तरीय पुरस्कारात नागपूर जिल्ह्यातील काटोल पंचाय समितीला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला असून १७ लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. वर्ष २०२२-२३च्या विभाग स्तरावरील पुरस्कारात काटोल पंचायत समितीला पहिल्या क्रमांकाचा तर कामठी पंचायत समितीला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांचे स्वरुप अनुक्रमे ११ लाख आणि ८ लाख रुपये असे आहे. तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार चंद्रपूर पंचायत समिती आणि गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा पंचायत समितीला संयुक्तपणे जाहीर झाला असून या पंचायत समित्यांना पुरस्कार स्वरूपात प्रत्येकी ३ लाख रुपये प्रदान करण्यात येणार आहेत. वर्ष २०२०-२१च्या पुरस्कारात भंडारा पंचायत समिती विभागातून प्रथम आली असून राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. पुरस्कार स्वरूपात क्रमश: ११ लाख आणि १५ लाख रुपये या पंचायत समितीला प्रदान करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पोभुर्णा पंचायत समिती विभागातून दुसऱ्या तर नागपूर जिल्ह्यातील कामठी पंचायत समिती तिसऱ्या क्रमांकावर राहिली आहे. या पंचायत समित्यांना पारितोषिक स्वरुपात अनुक्रमे ८ लाख व ६ लाख रूपये प्रदान करण्यात येणार आहेत.राज्याच्या ग्राम विकास विभागामार्फत वर्ष २००५-०६ पासून स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने विभागस्तर व राज्यस्तरावर राज्यातील पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकासकार्यात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या जिल्हापरिषदा, पचंयात समित्या आणि गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्काराने गौरविण्यात येते.

काटोल पंचायत समिती नेहमीच विविध उपक्रम राबविण्यात अग्रेसर असते. पंचायत समितीत व्यवस्थापन, कार्यपद्धती, स्वच्छता उत्तम आहे. विशेष म्हणजे पंचायत समितीत येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचा मान सन्मान होतो. सभापती म्हणून यशवंत पंचायतराज अभियानात राज्यात पुरस्कार पटकावणे ही माझ्यासाठी फार आनंदाची बाब आहे. पुढील काळामध्ये सर्वांच्या सहकार्याने आणखी जास्त प्रयत्न करून पंचायत समितीचे नाव देशपातळीवर नेणार. – संजय डांगोरे, सभापती, पंचायत समिती काटोल

नवव्या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आर्वी येथे येत्या ११ फेब्रुवारीला आयोजन


दै,जनप्रभात
आर्वी:/प्रतिनिधी:-

समता साहित्य मंच आर्वी आष्टीचे ९ ने आंबेडकरी साहित्य संमेलन आर्वीच्या क्रांतिकारी वर्धा जिल्ह्याच्या रणवीर भूमित होऊ घातले आहे. मनुवादी व्यवस्थैनै साहित्याच्या माध्यमातूनच भ. बुद्धाच्या क्रांतीप्रवण विचारावर प्रतिक्रांतीने कुठाराघात घालून विजय मिळविला आहे. मिथ्या विचार धारणांचा उद्घोषकरित सत्याला वेठीस धरण्याचे काम ही मनुवादी व्यवस्था सातत्याने करीत आली आहे. म्हणून सत्याचा आग्रह धरणार हे आंबेडकरी साहित्य संमेलन उत्क्रांतीच्या विज्ञाननिष्ठ युगात सुध्दा अनेक जटील समस्या आणि राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक रोजगाराच्या भीषण समस्यांचा महाकाय जबडा आ वासून आहे. मानवी स्वातंत्र्य आणि जीवनमूल्याचे रक्षणासाठी अनेक उपाय असले तरी, मानवी उत्थानासाठी सांस्कृतिक पौषणातून हे जटील प्रश्न सोडविण्याकरिता साहित्य निर्मिती है हेच खरे हत्यार आहे. साहित्य ही क्रांतीची जननी असल्याने या प्रभावी माध्यमाकडे दुर्लक्ष होऊ नये. जीवनमूल्य वृद्धिंगत करण्याकरिता साहित्याला अधिक धार लावावी लागेल. आणि त्याची साहित्य विचारपिठावरुन पुन्हा पुन्हा उजळणी व्हावी या विवेकवादी हेतूनेच या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. समता साहित्य मंच आर्वी आष्टी डरा नवव्या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन येत्या ११ फेब्रुवारी २०२४ ला रोशन मंगल कार्यालय येथे स्मृतिशेष रामदासजी शेंडे परिसर व तुकाराम अंबादास पुरोहित विचारमंचावर आयोजीत करण्यात आले आहे. आंबेडकरी साहित्य संमेलनाची सुरवात ग्रंथदिंडीने होणार असून ग्रंथदिंडी सिध्दार्थ सार्वजनिक वाचनालय कन्नमवार नगर आर्वी ते समारोप रोशन मंगल कार्यालय होणार





आहे. पहिल्या सत्रात नवव्या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मान. उत्तम कांबळे संपादक, पत्रकार आणि साहित्यिक आहेत. उत्तम कांबळे यांनी अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले. सांगली येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते तर, ८४ व्या ठाणे येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. नंतर चंद्रपूर येथे फेब्रुवारी २०१२ मध्ये झालेल्या ८५व्या अधिवेशनात उत्तम कांबळे यांनी नूतन अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हाती अध्यक्षपदाची सूत्रे दिली त्यांची खुप सारी ग्रंथसंपदा आहे तसेच या कार्यक्रमाचे उद्घाटक ज्येष्ठ पत्रकार व आंबेडकरी विचारवंत प्रा. रणजित मेश्राम नागपूर आहे तर स्वागताध्यक्ष प्रा. डॉ अनिल भगत प्रमुख अतिथी प्रा जावेद पाशा नागपूर व अरुणकुमार हर्षबोधी आहे या प्रथम सत्रात पाहुण्यांचा परिचय प्रा डॉ अनिल दहाट करून देणार असून सुत्र संचालन पुरुषोत्तम डोंगरे व आभार अरविंद वावरे करतील. समता साहित्य मंचाची भूमिका मनोहर लांडगे विषद करतील. या प्रसंगी आंबेडकरी चळवळीत कार्य केलेल्या जेष्ठ कार्यकर्ते सुखदेवराव मिरगे रामचंद्रजी कांबळे प्रल्हाद देशभ्रतार अरुण भोगे प्रा डॉ मुकुंद शेंडे यांचा सत्कार होणार आहे या साहित्य संमेलनांत पुस्तक प्रकाशन होणार असून डॉ आंबेडकरांचा लोकशाहीचा लढा , प्रस्तावना व नवी लोकशाही फुले शाहू गांधी आंबेडकर का ब्राम्हणी राष्ट्रवाद से संघर्ष लेखक प्रा जावेद पाशा तसेच रवी दलाल यांची नामा कादंबरी व संपादक माया वासनिक (गेडाम) यांच्या साप्ताहिक वज्जी संदेश या साप्ताहिकाचे प्रकाशन होणार आहे. तसेच या साहित्य संमेलनात परिसंवाद आयोजित केला असून परिसंवादाचा विषय भारतीय लोकशाही समोरील आव्हाने आणि आंबेडकरी समाजाची भूमिका या परिसंवादाचे अध्यक्ष प्रा जावेद पाशा तर वक्ते प्रा डॉ प्रकाश राठोड व प्रा डॉ मनोहर नाईक राहणार आहे पाहुण्यांचा परिचय कवी दिगंबर झाडे करून देणार आहे. प्रास्ताविक प्रा डॉ प्रवीण काळे सूत्र संचालन राजकुमार सोनटक्के तर आभार विलास गायकवाड करणार आहे साहित्य संमेलनात एकपात्री नाटक शिल्पकार विलास थोरात डॉ बाबासाहेब आंबेडकर नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा अमरावती सादर करणार आहे तसेच कवी संमेलन आयोजित करण्यात आले असून कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवियित्री आयु सुरेखाताई भगत आहे तर सहभागी कवी दिगंबर झाडे मायाबाई वासनिक गणेश थोरात पुष्पाताई बोरकर आर.एस. तायडे, सोपान दातार गणेश लांडगे, पुरुषोत्तम डोंगरे संजय ओरके राजकुमार सोनटक्के सुभाष गडलिंग निर्मल काळबांडे अरुण विघ्ने प्रकाश बनसोड प्रा भूषण रामटेके नंदकिशोर दामोधरे, संजय घरडे, इंग्राहीम खान, रोशन गजभिये, संजय मोखडे, देविलाल रौराळे, रत्ना मनवर, प्रकाश कांबळे, एम.बी बागडे, कृष्णा हरले, ग्रंथपाल सुरेश भिवगडे, अमृता मनोहर, अरुण मानकर, चंद्र गाडगे, प्रशांत ढोले, रवी दलाल, प्रकाश जिंदे, अभिजीत राऊत, प्रांजली व्यंकटेश आत्राम, नंदा पांडे, भाष्कर काळे, सचिन सुर्यवंशी, मनोज सोनोने, प्रा. डॉ. विजयाताई मुळे, देवीदास निकाळजे, आदी मान्यवर कवी सहभागी होणार आहे समारोपीय सत्रात संमेलनाध्यक्ष मा. उत्तम कांबळे , सुप्रसिद्ध साहित्यिक, नाशिक प्रमुख उपस्थिती मा. नरेंद्र फुलझेले, अपर जिल्हाधिकारी, वर्धा प्रमुख उपस्थिती : मा. प्रा. डॉ. विजयाताई मुळे, मा. प्रल्हादजी देशभ्रतार मा. राजेश सोनोने, कार्यकारी अभियंता, नागपुर संचालन मा. नंदा पांडे तर आभार मा. अनिल खैरकर मानतील उपरोक्त आंबेडकरी साहित्य संमेलन यशस्वीतेसाठी संपूर्ण समता साहित्य मंचचे कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत. असे प्रसिध्दीप्रमुख सुरेश भिवगडे यांनी कळविले आहे.


|| समारोप ||
सायं. ६.०० वाजता
संमेलनाध्यक्ष : मा. उत्तम कांबळे, सुप्रसिद्ध साहित्यिक, नाशिक
प्रमुख उपस्थिती : मा. नरेंद्र फुलझेले, अपर जिल्हाधिकारी, वर्धा
प्रमुख उपस्थिती : मा. प्रा. डॉ. विजयाताई मुळे, आर्वी
मा. प्रल्हादजी देशभ्रतार
मा. राजेश सोनोने, कार्यकारी अभियंता,नागपूर
संचालन : मा. नंदा पांडे
आभार : मा. अनिल खैरकर
|| आयोजन समिती ||
आर्वी : पूरणभाऊ सुर्यवंशी, सुखदेवराव नंदागवळी, प्रा. राजेश सवाई, प्रवीण काळे, दीपक ढोणे, प्रमोद चोरपगार, अजय वाघमारे, सूरज मेहरे, सचिन मनवरे, सूरज मेश्राम, दर्पण टोकसे, गौतम कुंभारे, संदिप सरोदे, गौतम मेश्राम, अन्नारखान, राहुल शेंडे, रहपाल नाखले, सारिपूत्र भगत, सुरेश भिवगडे, प्रज्वल पावले, अंकुश पखाले, संकेत थुल, दिलीप पखाले, प्रवीण मनवर, विनोद पायले, अनिकेत वांबोळकर, आकाश सौदागर, अक्षय भगत, नारायणराव पाटील, विष्णूजी नाखले, रामदासजी नाखले, सारंगधर पासरे, ज्ञानेश्वरराव कांबळे, सुर्यभान नडे, अरुण डंभारे, नारायण कुसरे, विनोद बन्सोड, गौतम बागडे, सचिन कांबळे, राजेश सोमकुवर, राजकुमार मनोरे, मधुकर सोमकुवर, सुजित भिवगडे, पवन जंगम, श्रीकृष्ण अंडाऊ, रवी लडे, बंडू पाचोडे, एफ.के. गायकवाड, ओमप्रकाश सोनोने, देवेंद्र गुजर, सागर कठाणे, सुरवडे साहेब, मधुकर सवाळे, प्रितम मनवर
जळगाव : अरुण वैद्य, काशीराव तायवाडे, उमेश तायवाडे, अर्थव तायवाडे, सचिन पाचोडे, रंजना भालचक्र, संगिता तायवाडे, भारती पाचोडे, मंगला काळबांडे, पल्लवी वैद्य
आष्टी : अवधूत शेंद्रे, प्रा. डॉ. प्रशांत धनवीज, मिलिंद विघने,राहुल गजरे
तळेगांव : प्रकाश भित्रे, राजकुमार मुन, दिलीप गाडगे, कैलास गाडगे, प्रशांत पाटील, विलास पखाले, महेंद्र सरोदे, विजय थूल, सुनंदाताई तागडे
भारसवाडा : विश्वभूषण दलाल, महेंद्र चतूर, सुनील कांबळे, चंदू दहाट, दीपक शेंडे
खडकी : सुधाकर निकाळजे, मारोतराव निकाळजे, देवीदास निकाळजे
धरसोडा : चंद्रशेखर चतूर, मोहन चतूर, अनिल चतूर, अवधूत चतूर
संमेलनाध्यक्ष मा. उत्तम कांबळे
उद्घाटक मा. प्रा. रणजित मेश्राम
स्वागताध्यक्ष मा. प्रा. अनिल भगत
|| स्वागत समिती ||
मा. प्रा. डॉ. अनिल भगत, मा. प्रा. राजेश सवाई, मा. प्रकाश भित्रे, मा. संजय मात्रे,
|| संयोजन समिती ||
अरविंद वावरे/मनोहर लांडगे / प्रा. डॉ. प्रवीण काळे / पुरुषोत्तम डोंगरे/ राजकुमार सोनटक्के / दिगंबर झाडे / प्रा. डॉ. अनिल दहाट / सुरेश मोलके / अनिल खैरकर / मुकुंद वाघमारे / विलास गायकवाड / गणेश लांडगे / विजय खाकसे / इंदिराताई सु. निकाळजे / संगीता रा. विघने/ उषाताई गौ. मुंद्रे / बुध्दप्रास मिरगे / प्रल्हाद देशभ्रतार / भाऊराव दहाट / भगवंता पाचोडे / नविन वासेकर / वैकुंठ पाटील
: प्रसिद्धी प्रमुख :
मा. सुरेश भिवगडे, मा. धर्मशिल गेडाम, आर.एस. तायडे, बुद्धदास मिरगे
: संपर्क :
राजकुमार सोनटुके-८६६८७९२०३३, मनोहर लांडगे-७५८८७८६५५७
पुरुषोत्तम डोंगरे मो. ९९६०८३७२९६
स्मृतिशेष रामदासजी शेंडे परिसर
स्मृतिशेष अंबादासजी पुरोहित विचार मंचवर
समता साहित्य मंचचे संस्थापक सदस्य स्मृतिशेष राजकुमार विघने
स्मृति गौतम मुंद्रे, स्मृति सुखदेवराव निकाळजे यांना समर्पित
समता साहित्य मंच
आर्वी - आष्टी द्वारा
नववे आंबेडकरी साहित्य संमेलन
संमेलनाध्यक्ष : मा. उत्तम कांबळे, नाशिक
उद्घाटक : मा. प्रा. रणजित मेश्राम, नागपूर
प्रमुख अतिथी : मा. प्रा. जावेद पाशा, नागपूर
मा. अरुणकुमार हर्षबोधी, वर्धा
स्वागताध्यक्ष : मा. प्रा. अनिल भगत, आर्वी
रविवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२४, वेळ : सकाळी १० वाजता
स्थळ : स्मृतिशेष रामदासजी शेंडे, परिसर, रोशन मंगल कार्यालय, वर्धा रोड, आर्वी, जि. वर्धा
|| भूमिका ||
माननीय
सप्रेम जयभीम...
समता साहित्य मंच आर्वी आष्टीचे ९ वे आंबेडकरी साहित्य संमेलन आर्वीच्या क्रांतिकारी वर्धा जिल्ह्याच्या रणवीर भूमित होऊ घातले आहे. मनुवादी व्यवस्थैनै साहित्याच्या माध्यमातूनच भ. बुद्धाच्या क्रांतीप्रवण विचारावर प्रतिक्रांतीने कुठाराघात घालून विजय मिळविला आहे. मिथ्या विचार धारणांचा उद्घोषकरित सत्याला वेठीस धरण्याचे काम ही मनुवादी व्यवस्था सातत्याने करीत आली आहे, म्हणून सत्याचा आग्रह धरणारे हे आंबेडकरी साहित्य संमेलन
मानवी उत्थानाचे वैश्वीक्यभाव भिस्कर गाठण्यासाठी संघर्षाची मशाल घेऊन लढणाऱ्या कार्यकर्त्यांची फौज चळवळीला हवी आहे. त्याशिवाय आंबेडकरी चळवळ क्रांतीप्रवण होणार नाही. या आगमूमीवर समता प्रस्थापित करण्यासाठी अनेक भीम सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन चळवळीला सूर्यबळ बहाल केले आहे. आज फुले, शाहू, आंबेडकरांचा समतामूलक परिवर्तनाचा जागर देशभर सुरु असतांना मनुवादी कर्मठ विचाराच्या विषारी वाढळाने वैशाला चौफेर वेठीस धरले आहे. त्यांनी अल्पसंख्यांक शीतिर्,वंचित आणि समस्त बहुजनांना लक्ष केले आहे. वर्तमानात द्यनीय मानसिकतेने वास्तलेल्या शक्तिचे कपटी कटकारस्थानी मनसुबे हाणून पाडण्यासाठी आपण सर्वांनी एकजूट होणे गरजेचे आहे. जातीयवादाचे पाळेमुळे शोधून मानवी स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी अविश्रांत सर्व पातळ्यावरुन या शक्तीविरुद्ध लढले पाहिजे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून अभिव्यक्तीले समता, स्वातंत्र्य, व्याय, बंधुता या मानवी मूल्यांना पायथळी तुडविण्याचा घाट सर्व शक्तीनिशी हाणून पाडावा लागेल. या उन्मादावरिरोधात ठोस भूमिका घेऊन संविधाच्या रक्षणार्थ एल्गार पुकारने गरजेचे आहे.
उत्क्रांतीच्या विज्ञाननिष्ठ युगात सुध्दा अनेक जटील समस्या आणि राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक रोजगारांच्या भीषण समस्यांचा महाकाय जबडा आ वासून आहे. मानवी स्वातंत्र्य आणि जीवनमूल्याचे रक्षणासाठी अनेक उपाय असले तरी, मानवी उत्थानासाठी सांस्कृतिक पौषणातून हे जटील प्रश्न सोडविण्याकरिता साहित्य निर्मिती है हेच खरे हत्यार आहे. साहित्य ही क्रांतीची जननी असल्याचे या प्रभावी माध्यमाकडे दुर्लक्ष होऊ नये. जीवनमूल्य वृद्धिंगत करण्याकरिता साहित्याला अधिक धार लावावी लागेल. आणि त्याची साहित्य विचारपिठावरुन पुन्हा पुन्हा उजळणी व्हावी या विवेकवादी हेतूनेच या आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे.
आपण या संमेलनाला तन मन धनाने सहकार्य करावे.
ही विनंती.
आयोजक
समता साहित्य मंच,
आर्वी-आष्टी, जि. वर्धा
|| उद्घाटन समारोह ||
सकाळी १०.०० वाजता
ग्रंथ दिंडी : आयोजक मा. सुरेश भिवगडे
विशरण पंचशील : पळुवी/काजल/अमृता/राणी
अतिथीचे स्वागत :
पाहुण्यांचा परिचय : मा. प्रा. डॉ. अनिल दहाट
समता साहित्य मंचाची भूमिका: मा. मनोहर लांडगे
स्वागताध्यक्षीय भाषण : मा. प्रा. डॉ. अनिल भगत
सत्कार / स्वागत :
संमेलनाध्यक्ष : मा. उत्तम कांबळे, सुप्रसिद्ध साहित्यिक, नाशिक
उद्घाटक : मा. प्रा. रणजीत मेश्राम, पत्रकार, नागपूर
प्रमुख अतिथी : मा. प्रा. जावेद पाशा, नागपूर
मा. अरुणकुमार हर्षबोधी, वर्धा
कर्तृत्वाचा सत्कार :
मा. सुखदेवराव मिरगे मा. रामचंद्रजी कांबळे
मा. प्रल्हादजी देशभ्रतार मा. अरुणजी भोगे
मा. प्रा. डॉ. मुकुंद शेंडे
पुस्तक प्रकाशन :
१ डॉ. आंबेडकरांचा लोकशाहीचा लढा-मा.प्रा.जावेद पाशा
२) प्रस्तावना आणि नवी लोकशाही-मा.प्रा.जावेद पाशा
३) फुले-शाहू-गांधी-आंबेडकर का ब्राम्हणी राष्ट्रवाद से संघर्ष (श्री आवृत्ती) -मा.प्रा.जावेद पाशा
४) 'नामा' कांदबरी - मा. रवी दलाल
५) साप्ता. वज्जी संदेश - मा. मायाताई वासनिक (गेडाम)
उद्घाटकीय सत्र :
उद्घाटकीय भाषण : मा. प्रा. रणजीत मेश्राम, नागपूर
प्रमुख अतिथीचे भाषण : मा. अरुणकुमार हर्षबोधी, वर्धा
संमेलनाध्यक्षीय भाषण : मा. उत्तम कांबळे, नाशिक
सूत्रसंचालन : पुरुषोत्तम डोंगरे
आभार : अरविंद वावरे
|| परिसंवाद ||
दुपारी २.०० वाजता
विषय : ''भारतीय लोकशाही समोरील आव्हाने आणि आंबेडकरी समाजाची भूमिका''
परिसंवादाचे अध्यक्ष : मा. प्रा. जावेद पाशा, नागपूर
सहभाग : मा. प्रा. डॉ. प्रकाश राठोड, नागपूर
मा. प्रा. डॉ. मनोहर नाईक, नागपूर
पाहुण्यांचा परिचय : मा. दिगंबर झाडे,अमरावती
विषयाचे प्रास्ताविक : मा. प्रा. डॉ. प्रवीण काळे, आर्वी
सूत्रसंचालन : मा. राजकुमार सोनटक्के
आभार : मा. विलास गायकवाड
एकपात्री नाट्यप्रयोग : शिल्पकार
सादरकर्ते : विलास थोरात